तुम्हाला तुमच्या बिजनेस व इंडस्ट्रीमध्ये खुप समस्या येत आहेत का? तुमची इंडस्ट्री व बिजनेस प्रॉफीटमध्ये नाही का?
तर आता काळजी करू नका...
तुमच्या इंडस्ट्री, बिजनेसमध्ये कोनत्याही प्रकारची तोडफोड न करता सायंटिफिक पद्धतीने एनर्जी बॅलन्स करून येत असलेल्या समस्येतून मुक्त व्हा आणि ते पण खात्रीशीर.
या पॉजिटिव्ह ट्रान्सफॉर्मेशनचा अनुभव घेण्यासाठी आमच्याशी संपर्क साधा
भूमाता ॲडव्हान्स वास्तू । रिसर्च सेंटर
सोनानगर चौक, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर
भगिरथ भारद्वाज मो. 9529818737 / 0241-3599263
इंडस्ट्री, बिजनेस व कमर्शियल प्रोजेक्ट वास्तू एक्सपर्ट वेळ स.११ ते रा.८ कृपया अपॉइंटमेंट घेणे आवश्यक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०२.०७.२०२५ | अंक नं. ८० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

अहिल्यानगर जिल्ह्यात सर्व प्रथम
प्लास्टीक सेंटरिंग प्लाय (पॉलीप्रॉपलीन)
मल्टीपर्पज वापर
८० ते ९० वेळा रिपिट वापरू शकता
वजनाला हलका, तुटत नाही, खिळ्यांचे होल बुजवता येतात.
स्लॅबची क्वालिटी चांगली निघते.
८० ते ९० वेळा वापरून झाल्यावर रिसेल व्हॅल्यु सुद्धा मिळते.
Like & Follow Harish Agency
हरीष एजन्सीज्
राहुरी खुर्द, राहुरी, जि. अहिल्यानगर.
Contact - 7410717241 / 9370319458

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डद्वारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
+ 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# नगरच्या मार्केट यार्डमधील आठ दुकानांमध्ये चोरी; रोकडसह साहित्य लंपास, ३ चोरटे सीसीटीव्हीत कैद

नगर – नगरच्या मार्केट यार्ड मधील भुसार मार्केट मध्ये चोरट्यांनी ८ दुकाने फोडल्याची घटना २ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास घडली आहे. अज्ञात चोरट्यांनी दुकानांचे शटर उचकटून चोरी केली. यात काही दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात रोकड आणि इतर साहित्य चोरीला गेले आहे. या परिसरातील विविध दुकानांमध्ये असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्या मध्ये ३ चोरटे कैद झाले आहेत. एकाच वेळी ८ दुकानांमध्ये चोरी झाल्याने व्यापारी वर्गात घबराट पसरली आहे.

मार्केट यार्डच्या भुसार विभागात असलेल्या भागवत नारायण कोथंबिरे, अभयकुमार जयकुमार पुंगलिया, विजय शांतीलाल कटारिया, नितीन शांतीलाल कटारिया, माणकचंद उत्तमचंद भंडारी, सोलाट आणि कंपनी, नवकार ट्रेडर्स, शिवम सेल्स या शेजारी शेजारी असलेल्या ८ दुकानांमध्ये चोऱ्या झाल्या आहेत. या चोऱ्या पहाटे ३.४० ते

(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)

### एकाच वेळी अनेक दुकाने फुटण्याची पहिलीच घटना

मार्केट यार्ड मध्ये सुरक्षा रक्षक तैनात असतात. त्यामुळे किरकोळ अपवाद वगळता गेल्या १० –१२ वर्षात चोऱ्यांचे प्रमाण नगण्य झाले होते. एकाच वेळी अनेक दुकाने फुटण्याची मार्केट यार्डमधील ही पहिलीच घटना असल्याचे येथील व्यापाऱ्यांनी सांगितले. काही दुकानांमधून मोठ्या प्रमाणात रोकड चोरीला गेली आहे, तर काही दुकानांमधून इतर साहित्य चोरीला गेले आहे. या धाडसी चोरीच्या घटनेने भुसार विभागच नव्हे तर संपूर्ण मार्केड यार्ड मधील व्यापाऱ्यांच्या मध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी तातडीने चोरट्यांना पकडण्याची मागणी यावेळी व्यापाऱ्यांनी केली आहे.

### पोलिसांनी गस्त वाढविली मात्र चोऱ्या काही थांबेनात...

पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे हे जिल्ह्यात हजर होताच त्यांनी सर्व पोलिस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना पोलिस ठाणे हद्दीत रात्रीची गस्त वाढवून संशयित रित्या फिरणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलिसांनी शहर परिसरात रात्रीची गस्त वाढविलेली असून संशयितरित्या फिरणाऱ्या अनेकांवर कारवाया केल्या आहेत. पोलिसांनी गस्त वाढविली असतानाही चोऱ्या मात्र कमी झाल्याचे दिसत नाही. दररोज शहरासह उपनगरी भागात चोऱ्या, घरफोड्या होतच आहेत. त्यामुळे पोलिसांच्या गस्तीचा काही उपयोग होताना सध्या तरी दिसत नाही. तसेच पोलिसांच्या या कारवाया फक्त कागद रंगविण्यासाठी आहेत काय? अशी शंका आता नागरिक उपस्थित करू लागले आहेत.

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS
1 किलो I 500 ग्रॅम I 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टंट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

# कल्याण रोडवरील घरात पहाटे चोरी; टिव्ही आणि सोन्याचे दागिने लंपास

## पावन म्हसोबा नगरमधील घटना, ५ चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात झाले कैद

नगर – कल्याण रोडवरील पावन म्हसोबा नगरमध्ये चोरट्यांनी २ जुलै रोजी पहाटे २.३० च्या सुमारास घरफोडी करत घरातील टीव्ही आणि दागिने चोरट्यांनी चोरून नेले आहेत. चोरी करून मुदेमाल घेवून जाताना ५ चोरटे शेजारील घराबाहेर असलेल्या सीसीटीव्हीत कैद झाले आहेत.

पुरुषोत्तम नारायण गंजी (रा.पावन म्हसोबा नगर, कल्याण रोड) यांच्या घरी ही चोरी झाली आहे. गंजी हे इलेक्ट्रिशियन आहेत. त्यांची सासरवाडी नालेगावच्या दातरंगे मळ्यात आहे. त्यांच्या पत्नी मुलीसह माहेरी गेलेल्या होत्या. घरी ते व त्यांचा मुलगा हे दोघे जेवण करून झोपलेले असताना पहाटे १ च्या सुमारास त्यांना पत्नीने फोन करून मुलीची तब्येत अचानक बिघडली असून लवकर दातरंगे मळ्यात या असे सांगितले. त्यामुळे गंजी हे घराला कुलूप लावून मुलासह दातरंगे मळ्यात गेले. त्यांना सकाळी शेजाऱ्यांनी फोन करून तुमचे घर उघडे असल्याचे सांगितले. त्यामुळे ते तातडीने पावन म्हसोबा नगर मधील घरी गेले असता त्यांना दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी घरात जावून पाहिले असता सर्वत्र उचकापाचक झालेली दिसली. त्यानंतर घरातील एलईडी टीव्ही आणि कपाटातील अर्धा ते पाऊन तोळा वजनाचे सोन्याचे दागिने चोरीला गेलेले दिसले. त्यानंतर त्यांनी कोतवाली पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.

### शेजारच्या घरांना लावल्या बाहेरून कड्या

पोलिसांनी घटनास्थळी भेट दिल्यानंतर शेजारी असलेल्या घरांच्या बाहेरील सिसिटीव्ही फुटेजची पाहणी केली असता ५ चोरटे गंजी यांच्या घरातून चोरलेला टिव्ही व इतर मुद्देमाल घेवून जाताना दिसून आले. तसेच यावेळी चोरट्यांना कुत्रे भुंकत असल्याने त्यांनी कुत्र्यांना दगड फेकून मारल्याचेही सिसिटिव्ही फुटेजमध्ये दिसले. या चोरट्यांनी गंजी यांच्या घरी चोरी करण्यापूर्वी शेजारील घरांना बाहेरून कड्या लावल्या होत्या, असेही सांगण्यात आले.

# सावेडीतून भरदिवसा चोरी; ६० हजारांची रोकड लंपास

नगर – भरदिवसा बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करत आतील सामानाची उचकापाचक करुन बेडरुम मधील कपाटात ठेवलेल्या बॅग मधील ६० हजार रुपये चोरुन नेले. ही घटना सावेडी उपनगरातील नवलेनगर परिसरातील गजानन मंदिर मागे, महादेव निवास येथे ३० जून रोजी सकाळी ७ ते रात्री ११ या कालावधीत घडली.

याबाबत प्रशांत आत्माराम पाटील (वय ५८, मूळ रा. मुक्ताईनगर, जि. जळगाव, सध्या रा. महादेव निवास, गजानन मंदिर मागे, नवलेनगर, अ.नगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे अमेरिकन ॲलक्सल कंपनी, सुपा येथे नोकरीस असून दररोज सकाळी ७ वाजता घरातून जाऊन सायंकाळी उशिरा घरी परततात. त्यामुळे चोरट्यांनी पाळत ठेवून ही चोरी केली असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ३० जून रोजी फिर्यादी हे नेहमी प्रमाणे सकाळी ७ वाजता नोकरीसाठी गेले होते. रात्री ११ वाजता घरी परतल्यानंतर त्यांना घराचे कुलूप तुटलेले आढळून आले. घरात प्रवेश केल्यानंतर लाईट आणि फॅन सुरु असल्याचे दिसले, तसेच बेडरुममधील कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. कपाटात ठेवलेली ६० हजार रुपयाची रक्कम बॅगेतून चोरी झाल्याचे दिसून आले. त्यामुळे पाटील यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात जावून फिर्यादी दिली.

या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध बी एन एस कलम ३०५ (अ ), ३३१ (३) (४) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास महिला पोलीस अंमलदार संजीवनी नेटके या करीत आहेत. नवलेनगर परिसरात भर दिवसा घरफोडी झाल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

१० वी/१२वी/पदवीला कमी मार्कस् मिळाले किंवा नापास झालात !
चिंता कशाला ? प्रत्येक विद्यार्थी तर डॉक्टर, इंजिनिअर, आर्किटेक्ट होऊ शकत नाही. मार्क कमी मिळाले किंवा नापास झालात म्हणुन आपल्या आयुष्याचे सर्व पर्याय बंद झालेत असे नाही. परमेश्वर एक दरवाजा बंद करतो तर दुसरा उघडतो. निराश होण्याची गरज नाही. इथे उज्वल भवितव्य घडविण्यासाठी दुसरा दरवाजा उघडा. आहे या व प्रत्यक्ष भेटा.
दर्जेदार शिक्षण | प्रवेश सूचना | दर्जेदार नोकरी
कालावधी : एक/दोन वर्षे • पात्रता : १० वी / १२ वी / पदवीधर (पास/नापास)
INSTITUTE OF PARA MEDICAL SCIENCES
1) नर्सिंग कोर्सेस
2) PGDMLT - P.G. Dip. in Medical Lab Tech
3) DMLT - Dip in Medical Lab Tech.
4) Health & Sanitory Inspector
5) Operation Theater Assis. / Tech.
6) CCH / CGO / CCS - 2 Months (Dr. of any faculty)
7) Hospital Management
8) Dip. Course in Physiotherapy
9) X-Ray / ECG / C.T. Scan / MRI / Sonography / Dialysis / Cath Lab Tech.
10) Dental Mechanics Tech./ Hygienist Tech. कृत्रिम दात, फ्रेम, कवळी बनविणे व रिपेअर करणे.
11) Dental Assistant तोंडाची व दातांची देखरेख करणे.
12) Optometry / Optician Tech चष्म्यांचे नंबर काढणे, चष्मे, काचा व फ्रेम बनविणे. Contact Lences.
BOMBAY ACADEMY OF ARTS & EDUCATION
1) Pre Primary Teachers Course (बालवाडी/अंगणवाडी शिक्षिका)
MONTESSORI COURSE
2) Beauty Parlor & Hair Dressing
3) Fire & Safety Management
4) बांधकाम पर्यवेक्षक (ITI समकक्ष) (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक)
5) Computer Technology (Operating System, Graphics Designing, Website Designing, Software Developer, Networking, Database Operator)
J.J.M.F. JIVAN JYOT MEDICAL FOUNDATION
Mo. 8830685732 | Visit us : www.jjmf.info | Email : jjmf@rediffmail.com
उपरोक्त सर्व पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी

# ७/१२ उताऱ्यावरील नोंदी, दुरुस्तीसाठी महसूल कर्मचाऱ्यांकडून नागरिकांची होतेयं अडवणूक

### निषेधार्थ तहसील कार्यालयावर दिंडी नेवून तहसीलदारांना देणार कायद्याची पुस्तके भेट

नगर – नागरिकांच्या सातबारा उतारातील नोंदी अथवा महसूल कर्मचाऱ्यांनी चुकीच्या घेतलेल्या नोंदीमुळे उताऱ्यात झालेल्या चुकीच्या नोंदी दुरुस्त होण्यासाठी तलाठी, मंडलाधिकारी व तहसील कार्यालयात वारंवार खेट्या माराव्या लागत आहेत यामुळे जनतेला मनस्ताप सहन करावा लागतो. याच्या निषेधार्थ ३ जुलै रोजी तहसील कार्यालयात दिंडी नेवून तहसीलदारांना दप्तर दिरंगाई कायदा व माहितीचा अधिकार कायदा पुस्तके भेट देणार असल्याचे माहिती अधिकार कार्यकर्ते ॲड. श्याम आसावा यांनी म्हंटले आहे.

याबाबत त्यांनी तहसीलदारांना निवेदन दिले असून यात म्हंटले आहे की, सातबारा उताऱ्यावरील चुकीच्या नोंदी अथवा प्रलंबित नोंदी बाबत मालमत्ता धारकांना नोंदी होण्यासाठी कसे जेरीस आणले जाते याचे अनेक पुरावे यापूर्वी आपल्या कार्यालयात सविस्तर पत्रास दिलेली आहे. अनेक महिने अशा नोंदी न करता प्रलंबित ठेवून लोकांच्या मानसिक आर्थिक व शारीरिक छळ केला जातो . प्रत्येक वेळेस केवळ आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर काही नोंदी अथवा चुकीच्या झालेल्या नोंदीची दुरुस्ती यापूर्वी झालेली आहे. परंतु दिरंगाई करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई न केल्याने ही मानसिकता फोपावलेली आहे. तरी अशा कर्मचाऱ्यांवर दिरंगाई साठी कारवाई का होऊ शकत नाही याचा कोणताही खुलासा आज पावतो मिळालेला नाही. अद्यापही काही तक्रारदारांच्या नोंदी अनेक महिने होऊनही प्रलंबित आहे. शासकीय कार्यालयातील एका टेबलवरील कागद दुसऱ्या टेबलवर हलवण्याकरता लोकांना असे हलाल करून पेपरवेट ठेवण्यास भाग पाडले जाते. जी लोक पेपर वेट ठेवणार नाहीत त्यांचे पत्र व्यवहार विना प्रतिसादाची पडून आहेत. आपल्या तक्रारींवर तहसील कार्यालयातून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने याबाबत माहितीच्या अधिकार कायद्यानुसार पत्रव्यवहार केल्यानंतर त्यालाही थंड बासणात गुंडाळले जाते.

दप्तर दिरंगाई व माहितीचा अधिकार कायदा अशा कामचुकार व सेवेत कसूर करणाऱ्यांमुळेच करावा लागलेला असल्यामुळे या दोन्ही कायद्यांची पुस्तके आम्ही आपणास सप्रेम भेट देऊ इच्छितो. ती देण्यापूर्वी आम्ही आपणास वरील स्थितीबाबत पुरावे समक्ष दाखवू. सध्या वारकरी पंढरपूरच्या दिशेने दिंडीने जात आहे. या दिंडी म्हणजे भक्ती शक्ती व समर्पणचे प्रतीक आहे.

आपल्या कार्यालयात तसेच कार्यालयाच्या अधिपत्याखालील तलाठी कार्यालयांमध्ये जनतेच्या प्रति शासकीय कर्मचाऱ्यांची समर्पणाची भावना लोप पाऊली असल्याने या आंदोलनाद्वारे त्याबाबत आपल्याला भक्तीने विठ्ठल नामाचा गजर करत आपल्या कार्यालयाच्या आवारात दिंडी काढून आपल्यापर्यंत येत साकडे घालणार आहोत याची कृपया नोंद घ्यावी असे ही या निवेदनात म्हंटले आहे.

BRANDED
जीन्स व फॉरमल पॅन्ट
₹ 500 ला एक
₹ 900 ला दोन
₹ 1200 ला तीन
*मर्यादित स्टॉक
Terms & Conditions Apply.
भरपूर व्हरायटीज्
अहिल्यानगर शहरातील मध्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा महापालिकेत अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये कुत्रे सोडणार

नगर - शहरातील नालेगाव, गाडगीळ पटांगण, चितळे रोड, दिल्ली गेट, गांधी मैदान या परिसरामध्ये मोकाट कुत्रे टोळक्याने फिरत असल्यामुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माण होऊन त्रस्त झाले आहे. कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, नागरिकांना रस्त्यावरून फिरणे देखील कठीण झाले आहे. लहान मुलांवर अक्षरशा कुत्र्यांची टोळकी हल्ला करत जखमी करत आहे. एखाद्या दिवशी अनुचित घटना घडण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. नालेगाव येथे ५ वर्षाच्या लहान मुलावर कुत्र्याने हल्ला केला, त्या नंतर उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे नेण्यात आले. यावेळी दररोज नागरिकांवर कुत्र्यांची हल्ले होत असून मोठ्या प्रमाणात रेबीज इंजेक्शन लागत आहे. अशी माहिती सिविल हॉस्पिटल प्रशासनाकडून देण्यात आली आहे. महापालिकेच्या कुठल्याही उपयोजना नसल्यामुळे शहरातील नागरिकांना कुत्र्यांच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. येत्या ८ दिवसात मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा. अन्यथा महापालिकेत अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये कुत्रे सोडण्याचे आंदोलन केले जाईल. असा इशारा विकी वाघ यांनी निवेदनाद्वारे महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना दिला आहे. यावेळी प्रा. माणिकराव विधाते, सुरेश बनसोडे, भैय्या रोहकले, राकेश मिसाळ, गौरव सुरसे, गणेश दातरंगे, पै. अनिल वाणी, दत्ता वामन, अनिरुद्ध भोर, अक्षय पवार, संदीप ठाणगे, करण लांडे, बंटी काकडे, शिवम भंडारी, अतुल कावळे, अण्णा नायर, शुभम कावळे, मंथन चव्हाण, प्रसाद कपिले आदी उपस्थित होते.



८ दिवसात मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त न केल्यास महापालिकेत अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये कुत्रे सोडण्याचे आंदोलन केले जाईल, असा इशारा नागरिकांसमवेत विकी वाघ यांनी निवेदनाद्वारे महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना दिला आहे. (छाया - लहू दळवी)

माणिकराव विधाते म्हणाले की, नालेगाव येथे विकी वाघ यांच्या ५ वर्षाच्या मुलावर मोकाट कुत्र्याने हल्ला केला आहे. महापालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांना विविध संकटांना सामोरे जावे लागत आहे. आता गेल्या २ वर्षापासून महापालिकेवर प्रशासक राज असून, त्यांनी नगरसेवकासारखे काम करणे गरजेचे आहे. मात्र! त्यांच्याकडून चांगले काम होताना दिसत नाही. कुत्र्यांच्या त्रासाला नागरिक अक्षरशा कंटाळले आहे, तरी महापालिकेने कुत्र्यांचा बंदोबस्त तातडीने करणे गरजेचे आहे. असे ते म्हणाले.

सुरेश बनसोडे म्हणाले की, शहरात दररोज कुत्रे नागरिकांना चावा घेत आहे. गोरगरीब जनता या गोष्टीबाबत कोणाकडे न्याय मागतील, यापुढील काळात जर शहरात कुत्र्यांनी नागरिकांचा चावा घेतल्यास महापालिकेमध्ये हिंसक कुत्रे आणून आयुक्त, उपायुक्त यांच्या अंगावर सोडले जातील. कुठल्याही प्रकारे शहरात कुत्रे पकडले जात नसून, त्यांच्यावर कुठलीही शस्त्रक्रिया केली जात नसल्यामुळे कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे शहरातील नागरिक त्रस्त आहे, तरी येथे ८ दिवसात मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा अन्यथा आंदोलनाला सामोरे जा, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

"मुसाफिर"-९८२२०२०६९१



### सह-अनुभूती...सार्वजनिक सहानुभूती

दुसऱ्या कुणाच्या मनात काय चालले आहे हे समजण्याची क्षमता असणे हे केवळ मानवप्राण्याला मिळालेले वरदान आहे.

आपल्या मेंदूच्या विकासाने ते शक्य आहे. यामुळेच आपण इतरांच्या आयुष्याची कल्पना करू शकतो. त्यांचा आनंद समजू शकतो. त्यांना दु:ख-वेदना झाल्या, त्यांच्यावर अन्याय झाला, त्यांना इजा झाली तर कशा प्रकारचे शारिरीक वा मानसिक कष्ट त्यांना होऊ शकतात यीच कल्पना करू शकतो ती आहे सह-अनुभूती.

सह-अनुभूती ही शिकायची व जोपासावी अशी महत्त्वाची बाबा आहे. जेव्हा बालपणापासून सुरक्षित, प्रेमाचे, विश्वासाचे वातावरण भोवती असेल तर माणसांच्या मनात ती आपोआप समजण्याच्या शक्यता असतात. जेव्हा ती बहुसंख्यांच्या मनात पूर्णपणे रुजते तेव्हाच समता व न्याय या संकल्पनांची प्रत्यक्षात प्रचीती येऊ शकते.

पण ही संकल्पना जेव्हा रुजत नाही, नष्ट होते, हळूहळू अस्तित्वातच नसते तेव्हा काय होते? आपण दुसऱ्याचा विचार करत नाही ती क्षमताच नसते, केवळ 'स्व' महत्त्वाचा ठरतो. आपणच श्रेष्ठ, आपणच सत्ताधारी, आपल्याला सारे माहितच आहे. आपल्याकडे सगळे शहाणपण युगानुयुगे आहे, अधिक काही शिकण्याची गरजच नाही, असल्या विचारातून हळूहळू नव्याला नकार व जुन्याला कवटाळून बसण्याची सवय लागते. कारण ती सोपी आहे.

आपल्या सारखेच इतर आणि आपल्यापेक्षा वेगळे असणारे इतर यांच्याबाबत आपण कसा विचार करतो? कुठल्या दृष्टीकोनातून इतरांकडे पाहतो?

आजपेक्षा स्वार्थांध, भ्रष्टाचारी अन् विवेकशून्य बनत चाललेल्या समाजात 'सह-अनुभूती'चा आपण अधिक गांभीर्याने विचार करायला हवा, ती अनेक मनात रुजावी असा प्रयत्न व्हायला हवा. हा एक सग्र शिक्षणाचा भाग आहे. आपला अवकाश व स्वातंत्र्य, विवेकवाद व सह अनुभूती या साऱ्या एकमेकांत गुंतलेल्या संकल्पना आहेत आणि हाच सुखकर, आनंददायी, समानता आणि न्याय यावर उभारलेल्या आयुष्याचा पाया आहे.




मार्केट यार्ड मधील भुसार विभागातील ८ दुकाने चोरट्यांनी फोडल्यानंतर घटनास्थळी पाहणी करताना पोलिसांचे पथक, तसेच व्यापाऱ्यांची झालेली गर्दी.

# नगरच्या मार्केट यार्डमधील आठ दुकानांमध्ये चोरी

(पान १ वरुन)

४ वाजण्याच्या कालावधीत झाल्या असल्याचे सीसीटीव्ही फुटेज पाहिल्यावर लक्षात आले. भुसार विभागातील दुकाने सकाळी साधारण १० वाजण्याच्या सुमारास उघडतात. आज सकाळी नेहमीप्रमाणे काही व्यापारी आपली दुकाने उघडण्यासाठी आले असता त्यांना दुकानांचे शटर उचकटलेले, कुलुपे तुटलेली आढळली. त्यामुळे त्यांनी इतर व्यापाऱ्यांना फोन करून तातडीने बोलावून घेतले. सर्व व्यापारी तेथे जमा झाल्यावर एकूण ८ दुकानांमध्ये चोऱ्या झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे काहींनी तातडीने कोतवाली पोलिसांना माहिती दिली.

ही माहिती मिळताच पो.नि. प्रताप दराडे यांच्या सूचनेनुसार महिला स.पो.नि. तेजश्री थोरात, पोलिस उपनिरीक्षक दशरथ पडवळ, महिला पो.हे.कॉ. रोहिणी दरंदले, महिला पो.कॉ. कविता साठे, प्रज्ञा सरगड यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. श्वान पथकाचे स.फौ.रवि वीरकर हे ही सीमा नावाच्या श्वानाला घेवून पथकासह तेथे आले. श्वानाने चोरट्यांचा माग काढण्याचा प्रयत्न केला. पोलिस पथकाने परिसरातील दुकानांचे सीसीटीव्ही फुटेज पाहून तपासासाठी ते ताब्यात घेतले. दुपारी उशिरा ज्यांच्या दुकानात चोरी झाली ते व्यापारी पोलिसांच्या सूचनेनुसार फिर्याद देण्यासाठी कोतवाली पोलिस ठाण्यात गेले होते. तेथे संजय चुनीलाल लुणिया (रा. धार्मिक परीक्षा बोर्डाजवळ, आनंदधाम) यांनी फिर्याद दिली. त्यांच्या नवकार ट्रेडर्स या पशुखाद्याच्या दुकानातून चोरट्यांनी ६ हजार ५०० रुपयांची रोकड चोरून नेली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. इतर व्यापाऱ्यांच्या दुकानांतून काय काय चोरीला गेले याबाबत जबाब नोंदविण्याचे काम दुपारी उशिरापर्यंत सुरु होते.

भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., केडगाव अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

**१ ) मयत पार्वती विश्वनाथ जाधव यांचे वारस**
**२) श्री.गोरख विश्वनाथ जाधव मुलगा, रा.इंदिरानगर, केडगाव,अहिल्यानगर**
**३) श्री. नवनाथ विश्वनाध जाधव मुलगा रा . इंदिरानगर केडगाव अहिल्यानगर**

**विषय : गोरख विश्वनाथ जाधव यांच्या कर्जास पार्वती विश्वनाथ जाधव** हमीदार यांची स्वमालकीची स्थावर मालमत्ता तारण गहाणखत केलेली आहे .म्हणुन मयत हमीदार पार्वती विश्वनाथ जाधव यांचे वारस म्हणुन वारसदार नियुक्त करणेबाबत व कर्ज वसुलीबाबत.

संदर्भ : १ दिनांक १३ .०२ .२०२५ रोजीच्या मासिक पंचकमेटी सभा ठराव नं.६
२ दिनांक २३.०१.२०२५ जा. नं. ११६/२०२४-२५ ची आपणास वारस नियुक्ती बाबत नोटिस व कर्ज वसुलीबाबत नोटिस नं . १
३ दिनांक ३१.०५ .२०२५ जा. नं. १७ / २०२५-२६ ची आपणास वारस नियुक्ती बाबत व कर्ज वसुली बाबत- नोटिस नं- २

महोदय,
वरील संदर्भीय विषयास अनुसरून कळविण्यात येते की गोरख विश्वनाथ जाधव यांच्या कर्जास मयत पार्वती विश्वनाथ जाधव या हमीदार म्हणून त्यांनी स्वमालकीची केडगाव येथील गट नं. १४४/३ प्लॉट नं. ११५ ०.५९ .५७ चौ मी.ही स्थावर मालमत्ता तारण गहाणखत करून दिलेली आहे . सदर हमिदार पार्वती विश्वनाथ जाधव या मयत झालेल्या आहे . त्यामुळे संस्थेला मिळालेल्या माहितीनुसार संस्थेने वारस नियुक्ती केलेली आहे. या विषयी आपणास दोन वेळेस नोटीस बजावून दि . ०५.०२.२०२५ व दि १५.०६.२०२५ पर्यंत आपले म्हणणे सादर करण्यास संस्थेच्या मुख्य कार्यालय केडगाव येथे बोलवले होते दिलेल्या मुदतीत आपण हजर राहुन कुठलेही म्हणणे मांडले नाही सबब महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३० नियम २५ अन्वये आपण वारस ठरले आहेत तरी वरील कर्ज भरण्याची आपली जबाबदारी निश्चित होत आहे. तरी आपण ही जाहिर नोटिस मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत आपले म्हणणे योग्य न मांडल्यास व कर्ज खाते भरणा न केल्यास आपणा विरूध्द व जामिनदाराविरूध्द कर्ज वसुली संदर्भात योग्य ती कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी व सदर कारवाईस होणाऱ्या खर्चास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

सही/-
भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या.,अहिल्यानगर

## चंद्रकांत कोलपेक यांचे अल्प आजाराने निधन



नगर - पद्मानगर सावेडी येथील रहिवासी चंद्रकांत दत्तात्रय कोलपेक (वय ३३) यांचे २ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, बहीण असा परिवार आहे.

## अश्विनकुमार देशमुख यांचे हृदयविकाराने निधन



भिंगार - भिंगार ब्राम्हण गल्लीतील रहिवासी अश्विनकुमार परिचित देशमुख (वय ३६) यांचे १ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते जिल्हा कृषी खात्यामध्ये नेवासा येथे कार्यरत होते.

त्यांच्या मागे १ भाऊ, भावजय, पत्नी, मुलगा, काका, काकू असा परिवार आहे. भिंगार मधील मानाचा गणपतीचे देशमुख कुटुंब विश्वस्त आहेत.

### सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश

## राजेंद्र वानखेडे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश राजेंद्र गोविंदराव वानखेडे (वय ६२) यांचे १ जुलै रोजी हृदयविकाराने पुणे येथे निधन झाले. त्यांच्यावर २ जुलै रोजी अकोले येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांनी अ.नगरचे जिल्हा न्यायाधीश १ पदी ४ वर्षे कामकाज केले. त्याचप्रमाणे मोहटादेवी संस्थानचे अध्यक्षपदही त्यांनी भुषविले होते. त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, १ मुलगा असा परिवार आहे. ॲड. वरुण वानखेडे यांचे ते वडील होत.

## शशिकलाताई लयचेट्टी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - भराडगल्ली तोफखाना येथील रहिवासी सौ. शशिकला अरुण लयचेट्टी (वय ५८) यांचे २ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा असा परिवार आहे. अजयकुमार लयचेट्टी यांच्या त्या मातोश्री होत.

## मुमताज शेख यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - पिंपळगाव उज्ज्ैनी येथील रहिवासी मुमताज वसीम महंमद शेख (वय ७५) यांचे २ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पिंपळगाव उज्ज्ैनी येथे दफनविधी करण्यात आला.

त्यांच्यामागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या चांदभाई शेख यांच्या मातोश्री होत.

## रंजना हिरे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील रंजना गणपत हिरे (वय ६५) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, दिर, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. एचडीएफसी बँकेचे श्रीगीत हिरे यांच्या मातोश्री होत.

## रुक्मिणीबाई येमूल यांचे अल्प आजाराने निधन



नगर - पाईपलाईन हडको येथील रहिवासी रुक्मिणीबाई रमेश येमूल (वय ७५) यांचे २ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## राजाराम नागूल यांचे अल्प आजाराने निधन



नगर - दातरंगे मळा येथील आगरकरवाडा येथील रहिवासी राजाराम लक्ष्मण नागूल (वय ६०) यांचे २ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्याव नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बाळासाहेब नागूल यांचे ते चुलत बंधू होत.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद जमीनीचे विद्यमान मालक **१.ज्योती राजू पाखरे २.किरण राजू पाखरे ३.करुणा राजू पाखरे ४.कोमल राजू पाखरे, रा.कापुरवाडी तलावाजवळ, बुऱ्हाणनगर, अहमदनगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असून यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करून आमचे अशिलांबरोबर कायमखूष खरेदी देण्याचे ठरवून आमच्या अशिलाकडून रक्कम स्वीकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहित, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षीस, पोटगी हक्क सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यात येईल.

मिळकतीचे वर्णन :- डि.।। जिल्हा अहिल्यानगर/अहमदनगर सब डि.।। ता. अहिल्यानगर अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे **नागरदेवळे** येथील जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे :

| गट नंबर | हे.आर. | रु.पै. |
|---|---|---|
| २३१/२/१ | ४.१४ | ७.१६ |
| पो.ख. | ०.२६ | |
| | ४.४० | |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची पूर्व-उत्तर बाजूकडील ० हे ४० आर.जमीनीबाबत.
**यांसी चतु:सिमा-**
पूर्वेस : गट नं.पैकी — दक्षिणेस : गट नं.पैकी रस्ता
पश्चिमेस : गट नं.पैकी — उत्तरेस : गट नं.पैकी
येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखून न ठेविता

ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख
ॲड. कुरेशी फैजान फारुक
जीपीओ रोड,कलेक्टर ऑफिसशेजारी
अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७७०९७८६३१३

दिनांक : ०२/०७/२०२५
अहमदनगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल **महेमुदमियाँ अलीमियाँ सय्यद, साबीर दरवेश सय्यद** व इतर यांना वडिलोपार्जित वारसा हक्काने आलेली मिळकत असून, सदर मिळकतीबाबत मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे रे.सिव्हिल अपिल ३९/२०१७ दाखल असून, सदरचे अपिल न्यायालयात प्रलंबित आहे व सदर अपिलामध्ये शिल्पा शरद मुथा व अमित अशोक मुथा हे रेस्पॉडंट आहेत. सदर मिळकतीबाबत अमित अशोक मुथा, शिल्पा शरद मुथा यांनी दि.१०.०३.२०२५ रोजी अक्षय नरेंद्र बाफना, नरेंद्र संपतलाल बाफना यांचे बरोबर नोंदणीकृत साठेखत केल्याबाबतची माहिती आमचे अशिलांस मिळालेली आहे.

सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचे कायदेशीर हक्क, अधिकार व हितसंबंध आहेत तसेच मे.दिवाणी न्यायालयात अपिल प्रलंबित असल्याने साठेखत लिहून घेणार यांना सदर मिळकतीत मार्केटेबल मिळणार नाही व सदरचे साठेखत व त्याअनुषंगाने होणारे तथाकथित नियोजित खरेदीत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सबब सदर मिळकती संबंधाने कुणीही कोणत्याही प्रकाराचा व्यवहार, हस्तांतरण, करार, मदार करण्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. या उपरही कुणीही सदर मिळकती संबंधाने कोणताही व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व सदर खरेदी घेणार यास क्लिअर टायटल मिळणार नाही व मिळकतीचा ताबेकब्जा ही मिळणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी. सबब कुणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली असे.

परिशिष्ट

।।डि अहमदनगर सब डि।। व तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिंगार येथील मुकुंदनगर भागातील गट नं. ३०९ त्याचे क्षेत्र ३ एकर ४ गुंठे व पो.ख.० एकर २ गुंठे यांसि चर्तु:सिमा पूर्वेस : सर्व्हे नं.३०८, दक्षिणेस : सर्व्हे नं.३०८, पश्चिमेस : सर्व्हे नं.३०२ व २९१, उत्तरेस : सर्व्हे नं. २९१ येणे प्रमाणे चतु:सिमा पूर्वक जमीन तदंगभूत वस्तूंसह काही एक राखून न ठेवीता.

ॲड.जावेद ए.खान
रा.४९, कहकशा बंगला, मौलाना आझाद शाळेजवळ, इरिगेशन ऑफिसमागे,अहमदनगर
मो : ८६००८३९३८८, ९२७०६७७२०१

दिनांक : ०२/०७/२०२५
ठिकाण : अहमदनगर

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद मिळकत विद्यमान मालक **१.शेख मोहंमद हारुण मोहंमद युसूफ, २.शेख नूरहसन मोहंमद हारुण, ३.अजीम हारुण शेख, सर्व रा.१५८, मोमीनपुरा भिंगार, अहमदनगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असून यांनी सदर मिळकत विक्री करण्याबाबत आमचे अशिलांबरोबर कायमखूष खरेदी देण्याचे व्यवहाराची बोलणी चालू आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकत मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी हक्क सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून (७) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणाचेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यात येईल.

परिशिष्ट

**मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा तुकडी अहिल्यानगर/अहमदनगर, तालुका नगर पैकी, महानगरपालिका हद्दीतील **शहर** अहिल्यानगर/अहमदनगर येथील **पीरशाखुंट भागातील** मे.दू. निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील जागा व त्यावरील बांधकामाचे वर्णन खालीलप्रमाणे :

| सि.स.नं. | म्यु.घर नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| २२७७ | २०७५ | ३९.३० |

**यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची मध्यभागची संपूर्ण दुकान मिळकत त्याचे क्षेत्र १३.९४ चौ.मी.याची लांबी दक्षिण-उत्तर १४.६ चौ. फूट व रुंदी पूर्व-पश्चिम १० चौ. फूट या संपूर्ण दुकान मिळकतीबाबत.**
**यांसी चतु:सिमा-**
पूर्वेस : सि.स.नं.पैकी जागा — दक्षिणेस : वाग व पुढे रस्ता
पश्चिमेस : सि.स.नं.पैकी जागा — उत्तरेस : सि.स.नं.२२७६
येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखून न ठेविता

ॲडव्होकेट
नाजीम अहमद इस्माईल शेख
कुरेशी फैजान फारुक
जीपीओ रोड,कलेक्टर ऑफिसशेजारी
अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७७०९७८६३१३

दिनांक : ०२/०७/२०२५
अहमदनगर

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूदत केलेली मिळकत **१.राजू रतन भिंगारदिवे, २.सुनिता राजू भिंगारदिवे, रा.कापुरवाडी,ता.जि.अ.नगर** यांच्या मालकी वहिवाटीची असून, विद्यमान मालक यांनी आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड यांचेकडून कर्ज घेतलेले आहे. व सदर आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड यांचे व्यतिरिक्त सदर मिळकतीवर इतर कोणत्याही बँकेचा अथवा वित्तीय संस्थेचा बोजा नसून, सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलांबरोबर ठरलेला असून लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु, कोणाचीही कोणतीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, दान, बक्षीस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील पत्त्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

**परिशिष्ट :** मिळकतीचे वर्णन :- जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) पोट तुकडी व तालुका अहिल्यानगर (नगर) पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा परिषद हद्दीतील मौजे भिंगार येथील आमेना नगर भागातील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| २०९/१ पै | ३/४/५/६/७/३ | ९७.५० चौ.मीटर |

हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील आर.सी.सी.मधील असलेले ग्राउंड फ्लोअरवरील बांधकाम क्षेत्र ४५.४७ चौ.मी.तसेच यातील इले.लाईट मीटर व पाण्याचे नळ कनेक्शनसह मिळकत याचा बंगला/युनिट नं.३ असा आहे. यासी चतु:सिमा-
पूर्वेस : ९.०० मीटर रुंदीचा रस्ता
दक्षिणेस : प्लॉट नं.३/४/५/६/७/४ (बंगला/युनिट नं.४)
पश्चिमेस : सर्व्हे नं.२०९ मधील ले-आऊट मधील प्लॉट
उत्तरेस : प्लॉट नं.३/४/५/६/७/२ (बंगला/युनिट नं.२)

ॲड.तनवीर एम शेख
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
ॲड.गुफरान एफ.मोमीन
ॲड.मोहसीन आय.शेख
कस्तुरी प्लाझा, डावरेगल्ली,अहमदनगर,
मो : ८०८७७४२४२८,९२०९५९७१५०

दिनांक : ०२/०७/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली शेत मिळकत ही विद्यमान मालक **केतन संभाजी बांगर व कचरु अंबादास बांगर दोघे रा.वडगावगुप्ता ता. नगर,जि. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. त्याअन्वये विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाशी बोलणी केली असून आमच्या अशिलाकडून सदर विसारपोटी रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असून लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही **साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हकक, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात (७) दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगरपैकी ग्रामपंचायत हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे **वडगाव गुप्ता येथील शेत जमीन गट नं. १९५ यांचे क्षेत्र ०हे. ६३ आर. याचा आकार २ रु. १२ पै. यापैकी विद्यमान मालक केतन संभाजी बांगर यांच्या मालकीचे क्षेत्र ० हे. ३१.५० आर.व कचरु अंबादास बांगर यांच्या मालकीचे क्षेत्र ०हे. ३१.५० आर. ही संपूर्ण मिळकत.**
**यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :-**
पुर्वेस : रस्ता, — दक्षिणेस : गट नं.१९६
पश्चिमेस : गट नं.१९० — उत्तरेस ४ गट नं.१९४
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत

ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे
ओंकार पंडित मोरे, मो : ९८६०६४६४६२३
महालक्ष्मी चेंबर्स, मोरया मंगल कार्यालयासमोर,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर

अहिल्यानगर
दिनांक : ०२/०७/२०२५

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली प्लॉट मिळकत विद्यमान **छाया बाबासाहेब जरे, रा.बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर** यांचे स्वकष्टार्जित मालकीची आहे. सदर मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिलांची मिळकतीच्या विद्यमान मालकासोबत बोलणी चालू असून सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खात्री विद्यमान मालकांनी आमच्या अशिलास दिलेली आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, बँक, बोजा सोसायटी राईटस अन्न, वस्त्र, लीज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधिताने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन आठ (८) दिवसाचे आत खालील पत्त्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत चालणार नाही.

**परिशिष्ट :** १) मिळकतीचे वर्णन :- जिल्हा तुकडी अहिल्यानगर पोट तुकडी नगर तालुका नगरपैकी अहिल्यानगर जिल्हा हद्दीतील मौजे भिंगार सर्व्हे नं. २८५/२ अ मधील प्लॉट नं. २२ चे एकूण क्षेत्र १२९.०० चौ.मी. हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील आर.सी.सी. स्ट्रक्चरमधील बांधकाम क्षेत्र ७३.१०४ चौ.मी. (७८६.६ चौ.फूट) अशी मिळकत.
यांसी चतु:सिमा :-
पुर्वेस : प्लॉट नं.३१ — दक्षिणेस : प्लॉट नं.२१
पश्चिमेस : रस्ता — उत्तरेस : प्लॉट नं.२३

ॲड.संजय बबनराव गायकवाड
बी.ए.एलएलबी.डी.एल.एल. ॲण्ड ए.डब्ल्यू.
पत्ता : अपूर्वा कॉम्प्लेक्स, जामखेड रोड,
अहिल्यानगर, मो : ९४२१३३३३०२

दिनांक : ०२/०७/२०२५
अहिल्यानगर

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### सांभाळा डोळ्यांचे आरोग्य

आरोग्याच्या बाबतीत, क्वचितच हे लक्षात येते की आपण दुर्लक्षित केलेली काही सामान्य लक्षणे खरोखरच गंभीर आजार होण्याचा धोका दर्शवू शकतात. डोळ्यांच्या आतील काही बदल देखील आजारांना सूचित करतात. कधीकधी झोपेचा अभाव किंवा जास्त स्क्रीन वेळ यामुळे थकलेल्या डोळ्यांमुळे धूसर दृष्टी येते. तथापि, मधुमेही देखील अनेकदा या लक्षणाची तक्रार करतात, जे बहुतेकदा रक्तातील साखरेच्या पातळीत बिघाडामुळे होते. तथापि, हे मोतीबिंदू किंवा मॅक्युलर डीजनरेशनचे लक्षण देखील असू शकते. जर तुम्हाला तुमच्या डोळ्यांभोवती पांढरा कडा दिसला तर ते उच्च कोलेस्टेरॉल पातळीचे लक्षण असू शकते. जरी हे उघड्या डोळ्यांना दिसत नसले तरी, नियमित भेटी घेतल्यानंतर नेत्ररोगतज्ज्ञांना ते लक्षात येऊ शकते. वय वाढल्यामुळे किंवा उच्च एलडीएल (कमी घनता असलेल्या लिपोप्रोटीन) पातळीमुळे देखील हे विकसित होऊ शकते जे स्ट्रोकचा धोका दर्शवते.

## पाककला

### मालपुवा

**साहित्य :** २ ते तीन टेबलस्पून बारीक रवा, १/२ वाटी मैदा, १ वाटी गव्हाचे पीठ, १ वाटी साखर, १ टेबल स्पून वेलची पूड, १ टेबलस्पून सोप पावडर, केशर, १ वाटी दूध, १ वाटी तूप,

कृती : सर्वप्रथम आपण मालपोळ्यासाठी लागणारा पाक तयार करून घेऊयात पाक म्हणजे एक तारी किंवा दोन तारी नव्हे तर जेवढी साखर घेतली आहे त्याच्या निम्मे पाणी घालून ही साखर विरघळेपर्यंत उकळायचे आहे व त्यानंतर किमान दोन मिनिटे उकळून गॅस बंद करायचा आहे त्यामध्ये केशर वेलची पूड ही घालायची आहे. आता मालपुवासाठी लागणारे रवा मैदा आणि गव्हाचे पीठ एकत्र करून घ्यायचे आहे. चिमूटभर मीठ घालायचं त्यानंतर त्यामध्ये सौफची पावडर किंवा भरड घालायची आहे हे सर्व आधी कोरडे चमच्याने मिक्स करून घ्यायचे आणि नंतर त्यात दूध घालून हळूहळू त्याचे छान डोशाप्रमाणे बॅटर तयार करायचे आहे. हे बॅटर तयार करून दहा ते पंधरा मिनिटं किंवा अर्धा तास झाकून ठेवायचे आहे त्यानंतर तूप कढईमध्ये गरम करायचे आहे कढई पसरट असावी किंवा तुम्ही पॅनही घेऊ शकता तूप चांगले गरम झाल्यानंतरच त्यात मालपुवाचे बॅटर चमच्याने गोलाकार सोडायचे आहे पुरीचा आकार येईल एवढे बॅटर घातल्यानंतर ते एका बाजूने चांगले भाजू द्यायचे आहे त्याला चॉकलेटी रंग आल्यानंतर त्याला पलटावे दोन्ही बाजूनी छान चॉकलेटी रंगावर या पुऱ्या परताव्यात त्यानंतर त्या तेलातून काढून पाकामध्ये घालायचे आहेत आणि दोन्ही बाजूंनी भिजवायचे आहेत आणि मग त्या बाहेर काढून ठेवाव्यात अशा सर्व पुऱ्या झाल्यानंतर त्याच्यावरती ड्रायफ्रूट किसावेत.

## वास्तू

* विवाहित स्त्रीने पूजा करताना कधीही चंदनाचा तिलक लावू नये त्याऐवजी कुंकू लावावे.

* मुख्य दरवाजावर फुलाचे तोरण एक दिवसाच्या वर ठेवू नये. याने फुल सुकल्या नंतर त्यातून घरात नकारात्मकता पसरते.

* प्लॉटचा आकार हा सुरुवातीस मोठा, पण नंतर कमी कमी होत जातो. म्हणजेच सुख कमी होत जाणार. म्हणून हा प्लॉट काही तज्ज्ञांच्या मते अशुभ आहे.

## सल्ला

रोज रात्री झोपण्यापूर्वी नाकात दोन थेंब मोहरीचे तेल टाकल्यास पोट कधीच बाहेर येत नाही आणि शरीराचे संतुलन टिकून राहते.

## सौंदर्य

गुलाब पाण्यामुळे त्वचेवरील जास्तीचे तेल निघून जाते आणि त्वचेचा पीएच बॅलन्स सुधारतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ३ जुलै २०२५

**दुर्गाष्टमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, हस्त १३।५१, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३९ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ** : आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**मिथुन** : एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**कर्क** : आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील.

**सिंह** : कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**कन्या** : इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**तूळ** : कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** : आज आपणास कठोर श्रम करावे लागतील.

**धनु** : एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल.


**मकर** : आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**कुंभ** : मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**मीन** : आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२१२ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२११ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) मोघम ठेवलेले; डिपॉझिट ५) आश्चर्यकारक ८) मजुरांवर देखरेख करणारा ९) मळालेला १०) पाण्याचा बारीक प्रवाह; हत्याराची कापण्याची बाजू ११) व्याकूळ १३) तस्कर; चोरी करणारा १४) हार; माळ; सर १५) वडील; जनक; पिता १७) पलीकडे; झाडाखालचा ओटा १९) कितीही मिळाले तरी तृप्त न होणारा २२) पोते वगैरे शिवण्याची मोठी सुई २३) बरोबर; समोर; स्वच्छ २४) वेगाने वाहणारी हवा; वात; वारा

**उभे शब्द :-** १) अमका; फलाणा २) जकात वसुलीचे ठिकाण; अनेक रस्ते एकत्र येतात ते ठिकाण ३) मुस्लिमांची धार्मिक शिक्षण देणारी शाळा ४) तीन गुणांपैकी एक; अंधार ५) ज्याला मृत्यू नाही असा ६) पाणी; नीर; जीवन ७) भीमाने मारलेला एक राक्षस १०) खाण्यासाठी घेतलेला अन्नाचा गोळा; कवळ ११) दहीहंडीतील मिश्रण १२) हाताची करंगळी व अंगठा यातील जास्तीतजास्त अंतर १३) ताडन; मार १४) अपमान; अवमान; अवहेलना १५) सामान वगैरे ज्यात बांधतात ते कापड; गोणपाटाचा तुकडा १६) दार; दरवाजा; कवाड १८) पाठीच्या हाडांची गाठ २०) एक वृक्ष; वडाचे झाड २१) मोठी गोटी; वरचा भाग; आच्छादन

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : कर्म जेव्हा वसुलीला येते तेव्हा कोणताच वशिला चालत नाही परतफेड करावीच लागते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### लहान मुलांमध्ये विचार करण्याची क्षमता असते का?

नाही, लहान मुले विचार करू शकत नाहीत. विचार करण्याची क्षमता हळू हळू विकसित होते आणि मुलांमध्ये ती पूर्णपणे विकसित होण्यासाठी काही वर्षे लागतात.

लहान मुले हळू हळू गोष्टी शिकतात आणि समजून घेतात. जन्माच्या वेळी त्यांची दृष्टी खूप अस्पष्ट असते आणि त्यांना फक्त आकार, प्रकाश आणि हालचाल दिसते. जसजसे ते मोठे होतात, त्यांची दृष्टी सुधारते आणि त्यांना रंग दिसू लागतात. दोन महिन्यांच्या बाळाला लाल रंगाचा पाळणा आवडतो, असे एका अभ्यासात दिसून आले आहे.

चार महिन्यांच्या बाळाला वस्तूंची जागा, आकार शोधायला शिकायला लागते. पाच महिन्यांच्या बाळाला लहान वस्तू शोधणे आणि हलणाऱ्या वस्तूंचा मागोवा घेणे सोपे होते.

आठ महिन्यांपर्यंत, त्यांची दृष्टी त्यांच्या पालकांसारखीच चांगली होते.

विचार करणे, समस्या सोडवणे आणि तर्क करणे यांसारख्या गोष्टी मुलांमध्ये हळू हळू विकसित होतात. त्यामुळे, लहान मुले लगेच विचार करू शकत नाहीत, पण ती हळू हळू शिकत असतात.

### श्वेतराजाचा उद्धार

त्रेतायुगात एक फार मोठे वन होते. एकदा अगस्ती मुनींनी त्या वनातील आश्रमात एक रात्र वास्तव्य केले. दुसऱ्या दिवशी सकाळी आश्रमाबाहेर रस्त्यात त्यांना एक प्रेत पडलेले दिसले. ते कुणाचे, असा विचार मुनी करत होते तेव्हाच एका विमानातून एक दिव्य मनुष्य तेथे आला व त्या प्रेताचे मांस खाऊ लागला. अगस्तींनी त्याला याचे कारण विचारले असता तो म्हणाला, पूर्वकालात विदर्भदेशी माझा पिता वसुदेव राजा होता. मी त्यांचा मोठा मुलगा श्वेत व मला सुरथ नावाचा लहान भाऊ होता. पित्याच्या मृत्यूनंतर मी राजा झालो. बरीच वर्षे यशस्वीपणे राज्य केल्यावर मला वानप्रस्थाश्रमात जाऊन तपस्या कराविशी वाटू लागले, म्हणून सुरथाला राज्यावर बसवून मी वनात जाऊन उग्र तप केले. त्याच्या प्रभावाने मला ब्रह्मलोकाची प्राप्ती झाली. पण तेथे गेल्यावर मी सतत तहानभुकेने तळमळत असे. याचे कारण विचारल्यावर ब्रह्मदेव म्हणाले,

हा लोक भूकतहानविरहित असला तरी पृथ्वीवर काहीतरी दान केल्याखेरीज इथे काहीच खायला मिळत नाही. तू राजा असताना कुणाला भीकही दिली नाहीस, अतिथीला जेवण दिले नाहीस, म्हणून तुला तहानभुकेचे कष्ट पडतात. तुझे शरीर पृथ्वीवर पडलेले आहे, त्याचे मांस खाऊन तृप्त हो. तुझे शरीर अक्षय आहे. शंभर वर्षांनी अगस्तीमुनी तुझे हे संकट दूर करतील.

राजा श्वेताची ही कथा ऐकून अगस्तींनी आपली ओळख सांगितली. राजा त्यांना शरण आला. मुनींनी त्याची त्या घृणास्पद आहारापासून मुक्तता केली. आपला उद्धार केल्याबद्दल राजाने मुनींना एक दिव्य आभूषण कृतज्ञतापूर्वक भेट दिले. त्यांनी दान म्हणून त्याचा स्वीकार केला.

पुढे श्रीराम अयोध्येस राज्य करीत असता एकदा अगस्तींच्या दर्शनासाठी गेले होते, तेव्हा त्यांनी ते विश्वकर्म्याने बनवलेले दिव्य आभूषण रामांना अर्पण केले. प्राप्त झालेल्या वस्तूचे पुन्हा दान देण्याने महान फलाची प्राप्ती होते, असे सांगत अगस्तींनी ते घेण्याचा रामाला आग्रह केला. राजा हा इंद्र, वरुण, कुबेर, यम यांचा अंश असून तो प्रजेचा उद्धार करतो. आपलाही उद्धार व्हावा म्हणून हे आभूषण तू घ्यावंस, असे अगस्तींनी श्रीरामांना सांगितल्यावर रामाने त्याचा नम्रतेने स्वीकार केला.

## जीवन का अमृत (भाग १)



किसी शारीरिक या मानसिक तनाव के आँखे बंद कर लें तथा शरीर और वातावरण के ख्याल, साँस का या अन्य कोई और ख्याल, सभी छोड़ दें। आप अपनी दृष्टि दो भौहों के बीच, जो कुछ भी आप देखें, उसके मध्य में टिकाए और सतनाम शब्द का जाप बहुत धीरे-धीरे, मन ही मन करें, चाहे रुक-रुककर, ताकि आपकी आंतरिक दृष्टि में कोई विघ्न न पड़े। इस शब्द का जाप काल के किसी भी बुरे असर को दूर कर देगा। यदि आप प्रकाश देखें, तो यह और तीव्र होता जाएगा; अंत में यह फूट जाएगा और आगे का रास्ता दे देगा। यदि आप सत्गुरु के नूरी स्वरूप को देखें, जैसा कि आपने पहले देखा है, तो आप अपना ध्यान पूरी तरह उसके चेहरे पर टिकाएँ, इतना कि आप अपने आपको भूल जाएँ। इस प्रकार, आपमें ग्रहणशीलता का विकास होगा और सत्गुरु आपसे बातें करेगा।

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

अपने कानों को अँगूठों से बंद करके बैठो। केवल उस आवाज़ को सुनो जो कि दायी ओर से आती हो। वह आवाज़ पास आ जाएगी, तीव्र हो जाएगी और अंत में ऊपर से आना शुरू कर देगी और इसे बिना कान बंद किए भी सुना जा सकेगा। आपको आवाज का पीछा नहीं करना, जहाँ से वह आ रही हो, अन्यथा आवाज़ मध्यम पड़ जाएगी और धीरे-धीरे खत्म हो जाएगी। आप एक से ज्यादा प्रकार की आवाजें सुनेंगे, पर आप बड़े घंटे, शंख, बादल की गर्जन, मृदंग, वायलिन और बॉसुरी की आवाज़ पर ध्यान दें, जो कि उच्चतर किस्म की आवाजे हैं और शेष को छोड़ दें।

किनारे वाला नीला धब्बा दिखाई देता है, उसके बीच में देखना चाहिए और मन ही मन सिद्ध नामों का जाप करना चाहिए, बहुत धीरे-धीरे, चाहे रुक-रुककर, ताकि आंतरिक दृष्टि में कोई विघ्न न पड़े। ज्योति तीव्र और स्थिर हो जाएगी और अंत में फूटकर आगे का रास्ता दे देगी। आपने शब्द धुन को सुनने के बारे में कुछ नहीं लिखा, जो कि इतनी ही जरूरी है। श्रुति की धारा को, जो कि दायीं ओर से आती है, नियमित रूप से सुनना चाहिए। यह तीव्र हो जाएगी, पास आ जाएगी और अंत में ऊपर से आती सुनाई देगी। मुझे खुशी है कि आप भजन सिमरन में प्रेम पूर्वक समर्पित हैं, जिसके फलस्वरूप आप ध्यान में सत्गुरु के नूरी स्वरूप का आशीर्वाद पाते हैं और सत्गुरु की दया से घंटियों की पवित्र आवाज़ सुनते हैं, जो कि दायी ओर से आती है । जिदा सत्गुरु को अंतर में देखना एक दुर्लभ आशीर्वाद है। आप दृढ़ता से उसकी चमकदार आँखों और माथे पर देखें तथा अपनी ग्रहणशीलता बढ़ाने का प्रयास करें और मन ही मन सिद्ध नामों का जाप करें,

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

तरंगे निकलने लगती हैं। शांति, प्रेम, सुख, आनंद, दया, उत्साह, खुशी जितने भी सात्विक, राजसिक वा तामसिक भाव उत्पन होते हैं, ये भी सब केन्द्र हैं जिन से जब संकल्प गुजरते हैं तो वैसे ही प्रभाव वातावरण में होने लगते हैं। मन की यह विशेषता है कि आवश्यकता अनुसार अपने अन्दर नये नये यंत्र बनाता और तोड़ता रहता है। ये कार्य दिमाग के विभिन्न भागों में होता रहता है और इन केन्द्रों/यंत्रों का सीधा सम्बन्ध मन से होता है। जब भी मन में दुःख हो तो तुरंत समझ जाओ विचार गलत यन्त्र से गुजर रहे हैं। उसी समय विचार बदलो और उसका उल्टा अच्छा क्या है वह सोचो। जब मन में आने लगे तो समझो विचार अच्छे यंत्र से गुजर रहे हैं।

सकून आज्ञा चक्र -

२७ मन साधना का केन्द्र

हमारे दिमाग में जिस स्थान पर भगवान को याद करते हैं वह एक केन्द्र है जिस में ऐसी तरंगे बनती हैं जो भगवान तक पहुंचती हैं। अभ्यास से ये केन्द्र मजबूत बनता है और उससे ऐसी तरंगे निकलती हैं जो निरंतर हमें भगवान की याद आती रहती है। योग के समय ये तरंगे कैसे चलती है कोई नहीं जानता। ये तरंगे एक सिस्टम से चलती हैं। सिर में पतालू वाले स्थान पर जो बच्चे के जन्म के समय कोमल होता है, वहां शक्ति का केन्द्र/यंत्र होता है जिसे सहस्त्रार कहते हैं। इस सहस्त्रार में वह तरंगे बनती हैं जो भगवान तक पहुंचती हैं। यह तरंगे बहुत शक्तिशाली होती हैं। सहस्त्रार का यह भाग आज्ञा चक्र से नियंत्रित होता है। भगवान को तरंगे भेजने का अनटीना हमारे नाक के अन्दर है जहां नाक की हड्डी बढ़ जाने पर आपरेशन करवाते हैं।

### आज्ञा चक्र

यहां एक बहुत छोटा सा सुराख होता है बस इसी सुराख में अनटीना होता है। जहां से तरंगे भगवान के पास आती जाती हैं। ये अनटीना स्थूल शरीर में नहीं इसके अंदर सूक्ष्म शरीर है उसमें होता है। यह तरंगे आकाश में यों सीधी नहीं जाती। राकेट की तरह गोल गोल घूमती हुई चलती हैं। हमारे मन से निकली तरंगे घुमती हुई पृथ्वी के उतरी ध्रुव पर जाती हैं। वहां से तरंगे सूर्य के पास जाती हैं। सूर्य से तरंगे भगवान के पास जाती हैं। भगवान से शक्ति इसी रास्ते से हमें वापिस प्राप्त होती है। टी. वी. डिश छतरियों का मुंह सूरज की ओर रखा जाता है क्योंकि सूर्य स्थिर है और वहां से सिगनल लगातार प्राप्त कर सकते हैं तथा पृथ्वी के साथ घूमते हुये छतरी की दिशा सदा सूर्य की ओर रहती है। हमारे विचार उतरी ध्रुव से होते हुए भगवान तक आते जाते हैं। उत्तर दिशा की ओर मुंह करके योग लगाये तो तरंगों के आने जाने में सुविधा होगी। हम चाहे मुंह किसी भी दिशा की ओर कर के बैठें, तरंगे इसी रास्ते से जायेंगी।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

हॉटेलमध्ये जेवण झाल्यावर

पत्नी : अहो, वेटरला काही तरी टिप द्या

पती : लग्न करू नको रे बाबा!!!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणता शौर्य पुरस्कार सर्वोच्च मानला जातो?

– अशोक चक्र

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### पाळणाघर

* पाळणाघराच्या संचालिकेला मुलांचे मानसशास्त्र, शारीरिक प्रगती व आहारशास्त्राचे नियोजन याबद्दलची माहिती असणे आवश्यक आहे.

* लहान मुलांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असल्यामुळे अनेक वेळा लहान मूल पाळणाघरात आजारी पडते. मूल आजारी पडल्यानंतर त्याची तपासणी करण्यासाठी पाळणाघराशी संबंधित डॉक्टरांची नियमित तपासणी भेट आहे का. हे पाहून घ्यावे. कारण मुलांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी डॉक्टरांची व्हिजिट गरजेची आहे.

* पाळणाघरात आपल्याला मूल किती वेळ ठेवायचे आहे, आपल्या नोकरीची वेळ व तेथे मूल ठेवण्याची वेळ यांची सांगड घालता येते का, हे पाहावे. कारण काही पाळणाघरे ही अर्ध वेळ सकाळी १० ते ६ चालणारी असतात, तर काही पाळणाघरे ही दिवसभरासाठी असतात. ही सर्व चौकशी करूनच मुलांना पाळणाघरात ठेवावे.

* पाळणाघर कसे दिसते हे महत्त्वाचे नसून, तेथे गेल्यावर तुम्हाला आणि तुमच्या मुलाला आपलेसे वाटेल ते पाळणाघर नक्कीच चांगले.

* तेथील संचालिका, कर्मचारी व शिक्षिका तुमच्याशी कसे बोलतात-वागतात, याचा अंदाज घ्यावा. * मुल बोलण्याच्या वयातील असेल, तर घरी आल्यावर आज पाळणाघरात काय काय केले, हे विचारावे. मुलाबरोबर चर्चा केल्याने मूल पाळणाघरात आनंदी आहे की नाही, हे तुमच्या लक्षात येते.

**पाळणाघराचे फायदे :**

* मुलांना पाळणाघरात ठेवल्यास तेथील चांगल्या वातावरणात मुलांना लहान वयातच शिस्त व स्वच्छतेचे धडे मिळतात.

* इतर मुलांमध्ये मिसळण्याची कला ते लवकर अवगत करतात.

* शिशुवर्गात प्रवेश घेण्यापूर्वीच त्यांची शैक्षणिक जीवनाची पूर्वतयारी करून घेतली जाते. त्यामुळे त्यांचा भावी जीवनाचा पाया मजबूत होतो.

* मुलांमध्ये असणारी छंद, कलाकौशल्ये यांचा विकास होऊन बौद्धिक क्षमता वाढते.

* पाळणाघरात राहिल्यामुळे मोठ्यांशी व इतर मुलांशी कसे वागावे, याची कला ते शिकतात.

**आई-वडिलांची दक्षता :** पाळणाघरात मुलांना सोडताना मुले रडुन गोंधळ घालतात. अशावेळी त्यांचे मन तेथील खेळण्यात रमवून तुम्ही तेथून लवकर बाहेर पडा. सुरुवातीला तुम्हाला त्रासदायक काम मुलांना सवय झाल्यावर आपोआप पाळणाघरात रमतात. महिन्यातून एखाद्या सुट्टीच्या दिवशी पालकांनी मुलांसोबत पाळणाघरात वेळ घार तेथील वातावरणाचा, कामाचा अंदाज येईल व तुमच्या मुलासोबत इतरही मुलांना आधार मिळेल. तेथील मुलांसोबत गप्पागोष्टी, चित्रकला, संगीत आपल्याला, आवड आहे तो विषय मुलांना शिकवावा.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सीसीएमपी उत्तीर्ण डॉक्टरांना एमएमसी मध्ये रजिस्ट्रेशन मिळणार

## राज्य सरकारचा निर्णय, कृती समितीने केले जल्लोषात स्वागत

नगर – सीसीएमपी उत्तीर्ण डॉक्टरांना एमएमसी मध्ये रजिस्ट्रेशन मिळणार आहे. २०१४ साली राज्य सरकारने होमिओपॅथी डॉक्टरांना रुग्णसेवेसाठी ऍलोपॅथी औषध वापरण्याची परवानगी दिली. सीसीएमपी कोर्स एमबीबीएस कॉलेजमध्ये सुरू केला. गेल्या दहा वर्षांपासुन या सीसीएमपी कोर्स उत्तीर्ण डॉक्टरांची नोंदणी देणे कायद्याने एमएमसीला बंधनकारक असुनही ते देत नव्हते. परंतु आता राज्य सरकारने हस्तक्षेप करत तातडीने रजिस्ट्रेशन देण्याचे जाहीर केले आहे. यामुळे राज्यातील एक लाख होमिओपॅथी डॉक्टर्स आरोग्य व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहामध्ये येणार आहेत. सोबतच होमिओपॅथी डॉक्टरांना वन झिरो एट ॲम्बुलन्स नोकरी, प्राथमिक आरोग्य केंद्रात मेडिकल ऑफिसर नोकरी, सीएचओ पदांची नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



सीसीएमपी उत्तीर्ण डॉक्टरांना एमएमसीमध्ये रजिस्ट्रेशन मिळणार असल्याच्या राज्य सरकारच्या या निर्णयाचे कृती समितीने ढोल ताशाच्या गजरामध्ये गुलाल उधळत पेढे भरवत स्वागत केले.

होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी प्रॅक्टिसची परवानगी व सीसीएमपी कोर्स आणि एमएमसी रजिस्ट्रेशन मिळण्यासाठी गेल्या वीस वर्षापासुन महाराष्ट्र राज्य होमिओपॅथी डॉक्टर्स कृती समिती सातत्यपुर्ण संघर्ष व आंदोलनं करत आहे. राज्यभरातील डॉक्टरांच्या संघटित शक्तीद्वारे व सात्यत्यपुर्ण संघर्षामुळे हे यश प्राप्त झाले आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. रणजीत सत्रे, सचिव डॉ. विनय गरुड, डॉ. संजीव गडगे, डॉ. मनिष थवाणी, डॉ. किरण कर्डिले, डॉ. दिपक कारखिले, डॉ. गणेश गावडे, डॉ. राजेंद्र थोरत, डॉ. सुबोध देशमुख, डॉ. जगदीश निंबाळकर, डॉ. श्रीराम शिरसाठ, डॉ. सुरेंद्र खन्ना, डॉ. सोमनाथ गोपाळघरे, डॉ. अभय मुथ्था, डॉ. शंकर आहुजा, डॉ. करण गाडे, डॉ. प्रवीण मांडे, डॉ. पी एस आहुजा, डॉ. रवि सातपुते, डॉ. सुनिल कळमकर, डॉ. महेंद्र बेरड आदी उपस्थित होते.

त्यामुळेच अहिल्यानगर जिल्ह्यातील डॉक्टर्सनी एकत्र येऊन ढोल ताशाच्या गजरामध्ये गुलाल उधळत एकमेकांना पेढे भरवत राज्य सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य समितीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. विजय पवार यांनी सांगितले की गेल्या दहा वर्षाच्या संघर्षला यश मिळाले असुन आता होमिओपॅथी डॉक्टरांना भविष्यात अनेक संधी प्राप्त होणार आहे.

कृती समितीचे मार्गदर्शक डॉ. प्रशांत शिंदे यांनी सांगितले एक लाख डॉक्टरांच्या संघटित संघर्षाचा हा विजय आहे.

राज्यसचिव डॉ. अशोक भोजणे यांनी सांगितले की हा लढा खुपच खडतर आणि अवघड होता.


नगरमधील डॉक्टरांनी नगर ते पंढरपूर सायकलवारी यशस्वीरित्या पूर्ण केली.

# डॉक्टरांनी सायकलवर केली पंढरपूर वारी!

## सलग तिसऱ्या वर्षी पूर्ण केला उपक्रम

नगर – नगरमधील डॉक्टरांनी नगर ते पंढरपूर सायकलवारी यशस्वीरित्या पूर्ण केली. या सायकलवारीचे हे तिसरे वर्ष आहे. २८ जून रोजी पहाटे ५ वाजता इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष मिश्रा यांनी चांदणी चौकात झेंडा दाखवून सायकलवारीला प्रारंभ झाला. यात डॉ. प्रशांत तुवर, डॉ. राहुल पंडीत, डॉ. रामदास बांगर, डॉ. प्रदीप चोभे, डॉ. गणेश बडे, डॉ. अशोक पाटील, डॉ. दिनेश पाटोळे, डॉ. बाळासाहेब देवकर, डॉ. अमित थोपटे, डॉ. शिवराज गुंजाळ, डॉ. प्रवीण कराळे, डॉ. मंदार भोसले, डॉ. महेश घोडके, अभिजीत घोडके, साई पाटोळे, संजीवकुमार बारगळ यांचा समावेश होता.

चांदणी चौकातून निघाल्यानंतर रूईछत्तीशी व मिरजगाव, निमगाव डाकू, करमाळा आदी ठिकाणी चहापाणी, नाश्ता व जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. शेटफळ या गावी सर्वांनी मुक्काम केला. २९ जून रोजी उर्वरित ३० किलोमीटरचे अंतर सर्वांनी वारकरी पोषाखात पूर्ण केले. पंढरपूरला पोहोचल्यानंतर चंद्रभागेत स्नान केल्यानंतर सर्वांनी विठ्ठल मंदिराचे मनोभावे मुखदर्शन घेतले.

पुढील वर्षीही पंढरपूर सायकलवारी पूर्ण करण्याचा मानस डॉक्टरांनी या वेळी व्यक्त केला. सायकल चालविणे आरोग्यास हितकारक असल्याने नागरिकांनी जास्तीत जास्त सायकलचा वापर करावा, असे आवाहनही डॉक्टरांनी केले.



## भारतीय जनता पार्टीच्या सावेडी मंडलाच्या वतीने सीए स्थापना दिवसानिमित्त सत्कार

१ जुलै सीए स्थापना दिवसानिमित्त अहिल्यानगर सीए शाखेचे पदाधिकारी यांचा सत्कार भाजपा सावेडी मंडलाच्या वतीने करण्यात आला. अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांनी स्वागत केले. प्रास्ताविकात शारदा होशिंग यांनी केले. प्रदेश महिला सचिव गीता गिल्डा यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सीए शाखेचे अध्यक्ष प्रसाद पुराणिक, उपाध्यक्ष अभयकुमार कटारिया, सचिव महेश तिवारी, कोषाध्यक्ष महेश भळगट, सदस्य सुनंदा रच्चा, चांसी आगरवाल, सुजय पानसरे, सोमनाथ जाधव यांचा सत्कार करण्यात आला. महिला मोर्च्याच्या श्वेता पंधाडे, ज्योती दांडगे, कालिंदीताई केसकर, सुजाता औटी, वंदना पंडित, राखी आहेर, अर्चना बनकर, श्वेता कुलकर्णी, वैभव झोटिंग, राजू मंगलारप आदी उपस्थित होते.

## बीबीए, बीसीएसाठी आयएमएसमध्ये मोफत प्रशिक्षण वर्ग

नगर – सीईटी सेलतर्फे बीबीए, बीसीएकरीता आणखी एक प्रवेश परीक्षा १९, २० जुलै रोजी घेण्यात येणार आहे. यामध्ये अनेक विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

या विद्यार्थ्यांसाठी आयएमएस तर्फे मोफत सीईटी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षण वर्गाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयएमएसचे संचालक डॉ. एम. बी. मेहता व उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी केले आहे.

माहितीसाठी बीसीएकरीता डॉ. सय्यद (९८२३१००७५६) आणि बीबीएसाठी डॉ. भावसार (९९६०४५९६४७) यांच्याशी संपर्क साधावा.

# रुग्णांसमोर डॉक्टर देवरूपाने उभा राहतो

## पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे प्रतिपादन; नोबल हॉस्पिटल येथे डॉक्टर डे रक्तदान शिबिराने साजरा पोलीस अधीक्षकांनीही बजावला रक्तदानाचा हक्क

नगर – रुग्णांनी डॉक्टरांना देवाची उपमा दिली आहे. देवरूपाने रुग्णांसमोर डॉक्टर उभा राहतो. जेव्हा रुग्ण रुग्णालयातून बरा झाल्यानंतर हसतमुखाने बाहेर पडतो तेव्हा तो देवाबरोबर ज्याने आपल्याला जीवदान दिले आहे त्याचेही आभार मानतो. रुग्ण सेवा हे एक पुण्याचं काम आहे. त्याचबरोबर रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. वेळेत रक्त मिळालं नाही तर आयुष्य गमाव लागतं. जेव्हा रुग्णाला रक्ताची गरज लागते तेव्हा जात धर्म पहिला जात नाही फक्त रक्तगट पाहिला जातो ही देवाची देणगी आहे, असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले. ही देवाची किमया असल्याचे म्हणत सर्व डॉक्टरांना डॉक्टर डेनिमित्त व शेतकरी बांधवांना शेतकरी दिनानिमित्त शुभेच्छा त्यांनी दिल्या.


नोबल हॉस्पिटल येथे रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाउन व एशियन नोबल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर डेनिमित्त आयोजित रक्तदान शिबिराप्रसंगी रक्तदान करताना पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे. (छाया – समीर मन्यार)

नोबल हॉस्पिटल येथे रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाउन व एशियन नोबल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर डेनिमित्त आयोजित रक्तदान शिबाराच्या कार्यक्रमाप्रसंगी श्री. घार्गे बोलत होते. याप्रसंगी नोबलचे मेडिकल डायरेक्टर डॉ.बापूसाहेब कांडेकर, रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. विनोद मोरे, आयएमएचे अध्यक्ष सी डी मिश्रा, क्लबचे सचिव महेश गोपालकृष्णन, नोबलच्या संचालिका डॉ. संगीता कांडेकर, सीईओ विजय निकम, रोटरीचे माजी अध्यक्ष अजय पिसोटे, रो. प्रमोद पारिख, किरण कालरा, राहुल हिरे, डॉ. सुजाता उबाळे, टीना इंगळे, रो. प्रताप पांडे, डॉ. ज्योत्स्ना डौले, डॉ. रेणुका पाठक, सम्राट निकम अदींसह डॉक्टर्स व रोटरीयन उपस्थित होते.

यावेळी डॉ. बापू कांडेकर म्हणाले की, १ जुलैचे महत्व इतर दिवसांपेक्षा वेगळ आहे. डॉक्टर बी सी रॉय एक फिजिशियन होते. डॉक्टर की च्या माध्यमातून त्यांनी मोठी समाजसेवा करण्याचे महान कार्य केलं. त्यांना आदरांजली म्हणून हा दिवस साजरा केला जातो. आलेला रुग्ण कसा बरा होईल हसत रुग्णालयाच्या बाहेर जाईल हे ध्येय प्रत्येक डॉक्टरांचे असते त्यांच्या जीवनात आनंद देण्याचे काम डॉक्टर्स मंडळी करत असतात डॉक्टरांना जर देव म्हणत असाल तर तो एक माणूस असल्याचे सांगत रक्तदानाचे आयुष्यातील महत्त्व त्यांनी यावेळी विशद केले.

यावेळी पोलीस अधीक्षकांसह सर्व डॉक्टर्स, महिला डॉक्टर्स व रोटरियन यांनी आपला रक्तदानाचा हक्क बजावला. कार्यक्रमाचे नियोजन हॉस्पिटलचे व्यवस्थापक डॉ. विश्वजीत मोरे यांनी तर सूत्रसंचालन सीईओ विजय निकम यांनी केले. रो. महेश गोपालकृष्णन यांनी आभार मानले.


डॉक्टर डे निमित्त भारतीय जनता पक्षाच्या नगर शहर मध्य मंडलाच्या वतीने शहरातील मध्यवर्ती भागातील डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.

# समाजाने डॉक्टरांप्रती कृतज्ञ राहिले पाहिजे

## संतोष गांधी यांचे प्रतिपादन; डॉक्टर डे निमित्त भाजपच्या वतीने डॉक्टरांचा हृदय सन्मान

नगर – वैद्यकीय पेशा सर्वात पवित्र मानला जातो. डॉक्टर मंडळी आपलेच ज्ञान व अनुभवाने आलेल्या रूग्णांना वेदनामुक्त करतात. बंगाल चौकी, माणिक चौक अशा शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले डॉक्टर रुग्णांसाठी मोठा आधार आहेत. रात्री अपरात्री जरी त्यांना फोन केला तर ते लगेचच धावून येतात. अनेक कुटुंब डॉक्टरांना परिवातीलच सदस्य मानतात. समाजाने डॉक्टरांप्रती कृतज्ञ राहिले पाहिजे कारण ते खऱ्या अर्थाने देवदूत आहेत, असे प्रतिपादन संतोष गांधी यांनी केले.

डॉक्टर डे निमित्त भारतीय जनता पक्षाच्या नगर शहर मध्य मंडलाच्या वतीने शहरातील मध्यवर्ती भागातील डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. डॉ. दर्शन करमाळकर, डॉ. सागर सोनावणे, डॉ. धैर्यशील केवळ यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्रदेश कार्यकारिणी सदस्य संतोष गांधी, मंडल अध्यक्ष मयुर बोचूघोळ, सुनील तावरे, अनिल निकम, पियुष तावरे आदी उपस्थित होते.

मयुर बोचूघोळ म्हणाले की, राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त त्यांच्या अविरत सेवा कार्याचा सन्मान करतांना मनस्वी आनंद होत आहे. आयुष्यात प्रत्येकालाच कधी ना कधी दवाखान्यात जावेच लागते. डॉक्टर आपुलकीने विचारपूस करतात व औषधे देतात त्यावेळी रुग्णांना मोठा दिलासा मिळतो. आपण बरे होऊ असा आत्मविश्वास निर्माण होतो.

# अमोलक पॅरामेडिकल कॉलेजच्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम





नगर – अमोलक पॅरामेडिकल कॉलेज कडा येथे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई अंतर्गत ॲडव्हान्स डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी (PGDMLT) कोर्स चालविला जातो. नुकतेच उन्हाळी परीक्षा २०२५ चा निकाल लागला असून यामध्ये सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. ऐश्वर्या पत्रे प्रथम क्रमांक तसेच हायलीज निवृत्ती, गावडे प्रतीक्षा द्वितीय क्रमांक, आंधळे अविनाश, वाडगे प्रतीक, निकम ज्योती, अरजुगडे संदेश तृतीय क्रमांक तसेच शेख अल्ताफ, शेख अशर, शिंदे प्रणील, शिंदे विनोद, सुतार दिपाली, शिंदे सोनाली विशेष प्राविण्य सह उत्तीर्ण झाले.

विद्यार्थ्यांचे अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडाचे कार्यकारी मंडळ व विश्वस्त अध्यक्ष, कार्याध्यक्ष, प्रधानमंत्री, कोषाध्यक्ष तसेच सर्व पदाधिकारी आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## इलाक्षी ह्युंदाई मध्ये फ्री मान्सून चेकअप कॅम्प

नगर – ह्युंदाई मोटर्स लिमिटेड व इलाक्षी ह्युंदाई यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राहक जोडणी फ्री मान्सून चेकअप कॅम्प आयोजन करण्यात आले.

यामध्ये ७५ पॉईंट फ्री चेकअप, तसेच स्पेअर पार्ट, लेबर अशी सूट देण्यात आली आहे. २० जुलै पर्यंत या कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. यात गाडीचे वायपर, ब्लेड, टायर, बॅटरी, चेक करून घ्यावी, तसेच ग्राहकांसाठी गाडीच्या अतिरिक्त वॉरंटी वर ३५ टक्के सूट देण्यात आली आहे. ग्राहकांना कॅम्पचा लाभ घेण्याचे आवाहन शोरूमचे जनरल मॅनेजर राजू बेजगमवार यांनी केले आहे.


महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे शिल्पकार आणि माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अहमदनगर डिस्ट्रीक्ट फर्टिलायझर्स, सीडस ॲण्ड पेस्टीसाईडस डिलर्स असोसिएशनच्या वतीने कृषी दिन साजरा करण्यात आला.

# कृषी दिनानिमित्त हरित क्रांतीचे शिल्पकार कै. वसंतराव नाईक यांना आदरांजली

## अहमदनगर डिस्ट्रीक्ट फर्टिलायझर्स, सीडस ॲण्ड पेस्टीसाईडस डिलर्स असोसिएशनच्या वतीने कृषी दिन साजरा

नगर – महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे शिल्पकार आणि माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अहमदनगर डिस्ट्रीक्ट फर्टिलायझर्स, सीडस ॲण्ड पेस्टीसाईडस डिलर्स असोसिएशनच्या वतीने कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शहरातील अहिल्यानगर येथील अंबर प्लाझा सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि त्यांच्या कार्यास अभिवादन करून करण्यात आली. कृषी विकासात मोलाचा वाटा उचलणाऱ्या वसंतराव नाईक यांच्या योगदानाची आठवण करत उपस्थितांनी त्यांना आदरांजली वाहिली.

या वेळी असोसिएशनचे अध्यक्ष छबुराव हराळ, सचिव संग्राम पवार, खजिनदार धनंजय जोशी यांच्यासह शहरातील कृषी निविष्ठा विक्रेते उपस्थित होते. यामध्ये वृषभ गांधी, बच्चूशेठ गांधी, मनिष मुथ्था, विजयभाई गांधी, रोहन खिलारी, सागर तिपोळे, स्वप्नील गांधी, सुजित औसरकर, उमेश झंवर, सुनिल औताडे, बाबु देविकर यांचा सहभाग होता.

यावेळी बोलताना अध्यक्ष छबुराव हराळ यांनी सांगितले की, शेतकऱ्यांपर्यंत दर्जेदार व योग्य दरात खते, बियाणे व कीटकनाशके पोहोचवण्याचे आपले कर्तव्य आहे. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन आपण सर्वांनी एकजुटीने काम करणे गरजेचे आहे.

# चार्टर्ड अकाउंटंट्स हे फक्त आर्थिक सल्लागार नाहीत तर देश घडविणारे महत्त्वाचे स्तंभ

## सीए प्रसाद पुराणिक यांचे प्रतिपादन; सीए नगर शाखेचा वर्धापनदिनी १०२ रक्तदात्यांचे रक्तदान, जागतिक चार्टर्ड अकाउंटंट्स दिन साजरा

नगर – अहमदनगर चार्टर्ड अकाऊंटंटस शाखेच्या वतीने संस्थेच्या मध्यवर्ती शाखेचा ७७ वा वर्धापनदिन विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. चार्टर्ड अकाउंटंट्स ही फक्त आर्थिक सल्लागार मंडळी नाहीत, तर देश घडविणारे महत्त्वाचे स्तंभ आहेत. आपण आपली नैतिकता, प्रामाणिकपणा आणि सेवा ही मूल्ये कायम ठेवत पुढे जावे हीच आजच्या दिवसाची प्रेरणा आहे. सर्वांनी सामाजिक बांधिलकी जपून रक्तदान केले आहे, असे प्रतिपादन सीए शाखेचे अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक यांनी केले आहे.



बुरुडगाव रोड येथील सीए शाखेमध्ये वर्धापन दिनानिमित्त व जागतिक सीए दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

बुरुडगाव रोड येथील सीए शाखेमध्ये वर्धापन दिनानिमित्त व जागतिक सीए दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त विविध उपक्रमांचे उद्घाटन अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मोफत दंतरोग तपासणी शिबिराचेसुद्धा उद्घाटन ID च्या अध्यक्षा डॉ. मुस्कान तलरेजा यांच्या उपस्थितीत करण्यात आले. श्रीदीप हॉस्पिटल मधील डॉ. हर्षा गांधी यांनी दंतरोग तपासणी केली. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही रक्तदान शिबिराला प्रतिसाद मिळाला. यावेळेस जनकल्याण रक्तपेढी यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिरात १०२ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले.

यावेळी वृक्षारोपण, स्वच्छता अभियान राबविण्यात आले. पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. समाजप्रबोधनासाठी एक पदयात्रा (walkathon) आयोजित करण्यात आली. ही यात्रा 'सीए–राष्ट्रनिर्मितीचे आधार हा संदेश देत जनतेचे लक्ष वेधत होती.

सीए महेश भळगट यांनी सूत्रसंचलन केले. तर सीए अभयकुमार कटारिया यांनी आभार मानले. या कार्यक्रमास नगर सीए शाखेचे सर्व माजी अध्यक्ष सीए सभासद, विद्यार्थी आणि नागरिकांनी सहभाग घेतला. कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी नगर सीए शाखेच्या कार्यकारिणीचे सदस्य सीए अभयकुमार कटारिया, सीए महेश तिवारी, सीए महेश भळगट, सीए सुनंदा रच्चा, सीए ज्ञानेश्वर काळे, सीए चैन्सी आगरवाल, तसेच जनकल्याण रक्तकेंद्राचे डॉ. प्रसाद विटकर, जनसंपर्क अधिकारी शरद बळे, विनिता धामणगावकर, मेघा शिंदे, अनिता तरटे, चंद्रकला फंड आदींसह सीए विद्यार्थी शाखेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महत्वाची भूमिका बजावली.

# अहिल्यानगरच्या युवा तलवारबाजांचे छत्रपती संभाजीनगर येथे प्रदर्शन

## राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार

नगर – छत्रपती संभाजीनगर येथे २७ ते २९ जून दरम्यान पार पडलेल्या १० आणि १२ वर्षांखालील राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याच्या खेळाडूंनी लक्षवेधी कामगिरी करत सांघिक पातळीवर तृतीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत अहिल्यानगर तलवारबाजी संघटना च्या संघाने १० वर्षांखालील मुलींच्या 'इपी' गटात वसुधा साठेने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच, १० वर्षांखालील मुलींच्या 'फॉईल' गटात काव्या धनगेकर हिने द्वितीय, तर निधी देशमुख हिने तृतीय क्रमांक मिळवून जिल्ह्याची मान वाढवली. १० वर्षांखालील मुलांच्या 'इपी' गटात अक्षद दौंडने तृतीय क्रमांक मिळवला.

१२ वर्षांखालील गटातही अहिल्यानगरच्या खेळाडूंनी दबदबा कायम राखला. १२ वर्षांखालील मुलींच्या 'सेबर' गटात रिद्धी महाडिकने तृतीय क्रमांक पटकावला, तर १२ वर्षांखालील मुलांच्या 'सेबर' गटात प्रज्वल सत्रेने प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.


अहिल्यानगर जिल्हा तलवारबाजी संघटना व अहिल्यानगर ऑलिम्पिक असोसिएशन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. (छाया – समीर मन्यार)

या खेळाडूंची नाशिक येथे होणाऱ्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. यामुळे त्यांना राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे.

या खेळाडूंसोबतच प्रांजल बडगु, गौरी झिरपे आणि आर्यन सत्रे यांनीही स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. खेळाडूंना प्रशिक्षक सुनील गोडळकर, ओंकार सुरग आणि वैष्णवी गोडळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल अहिल्यानगर जिल्हा तलवारबाजी संघटना व अहिल्यानगर ऑलिम्पिक असोसिएशन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शैलेश गवळी, विशाल गरजे, प्रवीण कोंडावळे, राम गोडळकर, केदार देशमुख, महाडिक मॅडम, सौ. धनगेकर मॅडम, सौ. देशमुख मॅडम आणि वेदिका गोडळकर उपस्थित होते.

# सर्वसाधारण करावरील सवलत काळात महापालिकेची विक्रमी २७ कोटींची वसुली

## सवलत काळात कर न भरणाऱ्यांवर आजपासून दरमहा २ टक्के दंड आकारणी सुरू

नगर – महानगरपालिकेने एप्रिल ते जून या सर्वसाधारण करावरील सवलत कालावधीत या वर्षी विक्रमी २७ कोटींची वसुली केली आहे. ३९५१८ मालमत्ताधारकांनी या सवलतीचा लाभ घेऊन कराचा भरणा केला आहे. नियमित कर भरून शहराच्या विकासात हातभार लावणाऱ्या करदात्यांचे महानगरपालिकेकडून आभार व्यक्त करण्यात आले आहेत. तसेच, १ जुलैपासून म्हणजेच आजपासून मालमत्ता करावर २ टक्के दंड म्हणजेच शास्ती आकारणी सुरू करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली

महानगरपालिकेने एप्रिल व मे महिन्यात संकलित करावर १० टक्के सवलत दिली होती. २३४७८ नागरिकांनी व मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेऊन कर भरला. त्यानंतर जून महिन्यात १६०४० मालमत्ताधारकांनी ८ टक्के सवलतीचा लाभ घेऊन कर जमा केला. या सर्व मालमत्ताधारकांनी जमा केलेल्या २८.१३ कोटींमध्ये ८६.३२ लाखांची सवलत देण्यात आली असून, २७.२७ कोटी रुपयांचा प्रत्यक्ष कर महानगरपालिकेत जमा झाला आहे.

महानगरपालिकेने कराच्या वसुलीसाठी यंदा जनजागृतीवर अधिक भर दिला होता. त्यामुळे मागील वर्षीपेक्षा तीन कोटींनी अधिक कर जमा झाला आहे. यापूर्वी एप्रिल ते जून महिन्यात २२ कोटी, २४ कोटी रुपये कर वसुलीची नोंद झाली होती. यावर्षी वसुलीचा नवा विक्रम महानगरपालिकेने नोंदवला आहे. ज्या मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केलेला नाही त्यांच्यावर दरमहा २ टक्के शास्ती आकारणी सुरू करण्यात आली आहे. अधिकचा दंड टाळण्यासाठी मालमत्ताधारकांनी तत्काळ कराचा भरणा करावा. लवकरच मोठ्या थकबाकीदारांवर महापालिकेकडून कारवाई सुरू करण्यात येणार असल्याचे यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.


बाणेश्वर कॅम्पस ड्राईव्हमध्ये ८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

# बाणेश्वर कॅम्पस ड्राईव्हमध्ये ८ विद्यार्थ्यांची निवड

नगर – श्री बाणेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर येथे नुकत्याच प्लेसमेंट सेल व IQAC विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस रिक्रुटमेंट प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते. केंद्र सरकारच्या युवा व कौशल्य विकास या योजनेअंतर्गत औद्योगिक कंपनीमध्ये महाविद्यालयातील कला वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील पदवीधरांना तांत्रिक प्रशिक्षण मोफत दिले जाते, सोबत आकर्षक प्रशिक्षण भत्ता ही दिला जातो.

महाविद्यालयात आयोजित कॅम्पस मुलाखतीसाठी कायनेटिक इंजिनीअरिंग लिमिटेड या कंपनीचे मनुष्यबळ व्यवस्थापक सुनील मुंडलीक, इंजिनीयर व अॅड. कैलाश दिघे हे उपस्थित होते.

सुनील मुंडलिक यांनी विद्यार्थ्यांना कंपनी विषयी माहिती दिली. सध्या उपलब्ध व भविष्यातील नोकरीच्या सुवर्णसंधी बाबत मार्गदर्शन केले.

कैलाश दिघे यांनी संवाद, निर्णय क्षमतेचे महत्व व कौशल्य विकास योजना यावर मार्गदर्शन केले.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ व्ही एम जाधव सर यांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी मुलाखतीस सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे IQAC कॉर्डिनेटर डॉ. शेख एच. आर, परीक्षा विभाग प्रमुख डॉ. बी. एम. मुळे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कॅम्पस मुलाखती द्वारे महाविद्यालयातील एकूण ८ विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली.

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक आमदार शिवाजीराव कर्डिले, संचालक अक्षय कर्डिले व प्राचार्य डॉ. व्हि. एम. जाधव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्लेसमेंट सेल कमिटी चेअरमन प्रा. मोहिते मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

सूत्रसंचालन प्रा. पठाण मॅडम यांनी केले. प्रा.राऊत मॅडम यांनी आभार मानले.

# नगर शहरात खुल्या राज्यस्तरीय टॉपर स्पीड स्केटिंग स्पर्धा उत्साहात

नगर – बुरुडगाव रोड कै. पुंडलिकराव भोसले स्केटिंग रिंग येथे २५ वी टॉपर्स खुली राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेत राज्यामधील तसेच नगर जिल्ह्यासह, संगमनेर, श्रीरामपूर, राहुरी, श्रीगोंदा, आष्टी, कडा, बीड, छत्रपती संभाजीनगर, सुपा, शिरुर, पुणे, जामखेड, सोलापूर, बार्शी तसेच अकॅडमी, शाळा, जिल्ह्यातील खेळाडू, पालक, प्रशिक्षक आदींनी उपस्थित राहून स्पर्धेला प्रतिसाद दिला असल्याची माहिती अकॅडमीचे सल्लागार आसिफ इकबाल शेख व अध्यक्ष तथा संस्थापक प्रदीप पाटोळे यांनी दिली.


खुल्या राज्यस्तरीय २५ व्या टॉपर स्पीड स्केटिंग स्पर्धा पार पडल्या.

माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी खेळाडूंना स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या. स्पर्धेत क्वाड, इनलाईन, रिक्रिएशन इनलाईन, टेनासिटी स्केट प्रकार वय वर्ष ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १४ व खुल्या गटातील खेळाडुंना सुवर्ण, रौप्य, कांस्य पदके प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, अशी माहिती अॅकॅडमीचे कार्यध्यक्ष संजय नन्नवरे यांनी दिली.

या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय खेळाडू कार्तिक नन्नवरे व इतर खेळाडू सोहम शिंदे, वैभव पाटोळे, जय भंडारी, विआन मुथा, ईश्वरी आव्हाड, संस्कार कुलकर्णी, जोना जाधव, आदर्श बिश्वास, प्रणित पोखर्णा आदी खेळाडूंचे अतिवेगवान सामने लाक्षणिक ठरले तर सर्वाधिक लहान वय साडे तीन वर्षे असणाऱ्या श्रेणिका देशमुख व नुमान शेख यांनी सुंदर स्केटिंग करून सुवर्ण पदकाची कमाई करत प्रेक्षकांची मने जिंकली, अशी माहिती अकॅडमीचे सह.सचिव प्रविण गायकवाड व सदस्या विशाल साळवे यांनी दिली.

स्पर्धेच्या व्यवस्थापनाकरिता पियुष कदम, अक्षय चौधरी, प्रतिक्षा पाटोळे, आदित्य शिंदे, दर्शना काठेड, आदित्य सोनवणे यांनी काम पाहिले. स्पर्धा सुव्यवस्थेत पार पाडण्याकरिता पंच म्हणून ज्ञानेश्वर भोत, अमर लोंढे, जयेश आनंदकर, संजय वखारे, भिकन अंबे, अजय भटकर, संतोष धुत, सचिन डोंगरे, महेश आनंदकर, मुकेश चौधरी, वासिक शेख, सचिन गायकवाड, प्रितम जाधव यांनी काम पाहिले. किड्स क्लब प्री स्कुलच्या प्रिंसिपल सौ. रोहिणी धवक उपस्थित होते.

स्पर्धेचे सुत्रसंचालन अॅकॅडमीचे सविता पाटोळे यांनी केले तर सचिव तथा मुख्य प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय खेळाडू प्रशांत पाटोळे यांनी आभार मानले.


रुपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलचा ६५ वा वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना काळे सर. उपस्थित विद्यार्थी.

# रुपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलचा ६५ वा वर्धापन दिन उत्साहात

## अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर

नगर – रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूल, अहिल्यानगर या विद्यालयाचा ६५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाच्या संस्थापक दिवंगत मोतीलालजी आणि रूपीबाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी स्मारकाजवळ श्रीमती मुळे आणि विद्यार्थिनींच्या हस्ते सुंदर रांगोळी रेखाटण्यात आली. तसेच काळे सर यांनी वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा फलक साकारला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे प्राचार्य अजयकुमार बारगळ यांनी भूषवले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन कमलकर यांनी केले. प्राचार्य अजयकुमार बारगळ यांनी आपल्या भाषणात १९६० मध्ये स्थापन झालेल्या न्यू इंग्लिश स्कूलचा समृद्ध इतिहास, संस्थेची वाटचाल आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे ऋणनिर्देश कराळे सर यांनी केले. संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी विद्यालयास वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे नियोजन सेवक श्री. पांढरे आणि अमोल बांगर यांनी केले. यावेळी विद्यालयाचे उपप्राचार्य भांड सर, पर्यवेक्षक गिरी सर, अध्यापक बंधू–भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी, सेवक वर्ग, विद्यार्थी उपस्थित होते.

हा सोहळा विद्यालयाच्या गौरवशाली वाटचालीचा साक्षीदार ठरला असून, विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणारा ठरला.

## डॉ. सांगळे हॉस्पिटलच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त

# नगरमध्ये ५ जुलैला किडनी रुग्णांसाठी मोफत उपचार शिबिराचे आयोजन

नगर – बुरुडगाव रस्त्यावरील सांगळे हॉस्पिटल येथे ३५व्या वर्धापन दिनानिमित्त ५ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत मोफत किडनी रोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती डॉ. रंगनाथ सांगळे व डॉ. अमेय सांगळे यांनी दिली.

या शिबिरात मोफत निदान व उपचारासह किडनी, प्रोस्टेट, मुतखडे व मूत्ररोग आदि विकारांवर मोफत उपचार केले जाणार आहेत. शस्त्रक्रियेची आवश्यकता असणार्या रुग्णांवर सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केली जाणार आहे, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली.

डॉ. रंगनाथ सांगळे हे गेल्या सुमारे ३५ वर्षांपासून शहरात बुरुडगाव रस्ता येथे सेवा देत आहेत. रुग्णांसाठी अत्याधुनिक मशिनरी या हॉस्पिटलमध्ये उपलब्ध केल्यामुळे रुग्णांवर विनात्रास उपचार होत आहेत. डॉ. सांगळे यांच्या अत्याधुनिक हॉस्पिटलमध्ये ३–डी / कलर डॉप्लर सोनोग्राफी, युरोफ्लोमोट्री, आरआयआरएस (विना टाका लेसर शस्त्रक्रिया), टीयूआरपी दुर्बिणीद्वारे प्रोस्टेट, यूआरएसएल (बिना ऑपरेशन मुतखडा काढणे), टीयूआरबीटी (मूत्राशयाचा कॅन्सर), क्रिस्टोस्कोपी (मुतखड्याचे दुर्बिणीद्वारे परिक्षण) आदि सुविधा उपलब्ध आहेत.

शिबिरातसाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी ९४०५८०७०३७ व ०२४१–२३५९५२३

# श्री संत शिरोमणी जनार्दन स्वामी पायी दिंडीचे नगरमध्ये स्वागत

## प्रा. प्रभाकर गवांदे यांच्या पुढाकाराने आरोग्य तपासणी, औषधवाटप व महाप्रसादाचे आयोजन

नगर – छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील भायगाव येथून निघालेल्या श्री संत शिरोमणी जनार्दन स्वामी पायी दिंडी सोहळ्याचे स्वागत गवांदे क्लासेसचे संचालक प्रा. प्रभाकर गवांदे यांनी भक्तीभावाने व उत्साहात केले. गेल्या १५ वर्षांपासून वारकऱ्यांची सेवा करत असलेले प्रा. गवांदे यांनी यंदाही नेहमीप्रमाणे पुढाकार घेत वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले. या तपासणीनंतर आवश्यक त्या औषधांची व गोळ्यांची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. वारकऱ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते.


श्री संत शिरोमणी जनार्दन स्वामी पायी दिंडीचे अहिल्यानगरात स्वागत करत वारकऱ्यांची आरोग्यतपासणी करण्यात आली.

प्रा. प्रभाकर गवांदे म्हणाले, श्री विठुरायाच्या पायी दिंडीने समाजामध्ये अध्यात्मिकतेची भावना अधिक बळकट होते. हजारो वर्षांची ही परंपरा समाजाला नवी दिशा देणारी ठरते. वारकरी संप्रदायाच्या भक्तिभावात सामाजिक ऐक्य, संयम व निस्वार्थ सेवेचा आदर्श उभा राहतो, असे ते म्हणाले.

# वारकऱ्यांची सेवा हीच पांडुरंगाची सेवा : प्रकाश गोसावी

## दहिवड येथील दिंडीचे सावेडी गावात स्वागत

नगर – आषाढी एकादशी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. सर्व मानाच्या थोर संतांच्या दिंड्या पंढरपूर कडे मार्गस्थ झाले असून काही दिंड्या या अहिल्यानगर शहरातून पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. मोठ्या भक्ती भावाने वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे पायी दिंडी सोहळ्याने जात आहेत. वारकऱ्यांच्या रूपाने पांडुरंग साक्षात आपल्या घरी येत आहेत. वारकऱ्यांची सेवा हीच खरी पांडुरंगाची सेवा आहे, असे प्रतिपादन प्रकाश गोस्वामी यांनी केले आहे.



सावेडी गावात श्रीराम मंदिर दहिवड ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडी ही दिंडी दरवर्षी आषाढी एकादशी निमित्त अहिल्यानगर शहरातून पंढरपूरकडे मार्गस्थ होते. या दिंडीचे स्वागत सावेडी गाव येथील प्रकाश गोसावी व गोसावी परिवार यांनी केले.

याही वर्षी दिंडी चे शहरात आगमन झाल्यानंतर सावेडी गाव या ठिकाणी प्रकाश गोसावी, स्वामी गोसावी, समर्थ गोसावी व गोसावी परिवार व सावेडी गावच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



# डॉ. स्वाती चंगेडिया यांना फेलोशिप प्रदान

डॉ. स्वाती चंगेडिया यांनी गोवा डेंटल कॉलेज (बाम्बोलिया, गोवा) येथून क्लिनिकल इम्प्लांटेशन प्रोग्रॅम फेलोशिप अभ्यासक्रम यशस्वी पूर्ण केला आहे. इम्प्लांटेशन व कॉस्मेटिक डेंटलमधील डॉ. कानिर भाटिया यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

# चित्रकार प्रवीण नेटके यांना आदर्श शिक्षक व राष्ट्रीय समाज भूषण जीवन गौरव पुरस्कार

नगर – भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२५ चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व राष्ट्रीय समाज भूषण जीवनगौरव पुरस्कार अनुश्री धनश्री फाउंडेशन महाराष्ट्र राज्य च्या वतीने चित्रकार प्रवीण उत्तम नेटके यांना जाहीर करण्यात आला आहे.



शिक्षक, चित्रकार प्रवीण नेटके यांनी साहित्यिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये योगदान आहे. नेटके यांचे रेखाटलेले चित्र हे अनेक पुस्तकात व दिवाळी अंकात उपलब्ध आहे. गोरगरीब निराधार विद्यार्थ्यांना मोफत चित्रकलाचे प्रशिक्षण देत असून या कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले असल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड व सचिव यांनी दिली.

पुणे येथे पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.


बारा इमाम कोठला येथे हसन व हुसेन यांच्या सवारींची स्थापना करण्यात आली. यावेळी ट्रस्टी सय्यद दस्तगीर, बडेसाहेब जहागीरदार, विश्वस्त शकूर शेख, सय्यद जुबेर, रफा सय्यद, सय्यद नसीर, माजी नगरसेवक सय्यद सादिक, संजू जहागीरदार, सय्यद खलील, सय्यद जिशान, सय्यद निहाल आदी उपस्थित होते. (छाया – बबलू शेख)

# कॅलिडोस्कोप



## पतीने लावले पत्नीचे लग्न!

सोनम रघुवंशी आणि मेरठमधील सौरभ-मुस्कान सारख्या घटनांनी समाज हादरलेला आहे. मुली इतक्या क्रूर कशा होऊ शकतात, असा प्रश्न समाजाला पडला आहे. पण ही कथा या सर्व घटनाक्रमांत वेगळी ठरली आहे. उत्तर प्रदेशातील अमेठी येथे हे प्रकरण घडले आहे.

लग्नाच्या १३ वर्षानंतर या महिलेच्या जीवनात तिचा प्रियकर आला. दोघांमध्ये चोरून चोरून भेटी सुरू झाल्या. त्याची कुणकुण पतीला लागली. अमेठीजवळील गावातील सतई या तरुणाचे कुटमारा गावातील सीमासोबत लग्न झाले होते. लग्नाला १३ वर्षे पूर्ण झाली होती. दोघांमध्ये सर्व काही व्यवस्थित होते. पण त्यांना मुलबाळ नव्हते. या एकाच गोष्टीचे दोघांना दुख होते. त्यातच सीमा हिला तिचा प्रियकर शिवानंद अमेठीमध्ये दिसला. पुढे संपर्क वाढला. पत्नी आता पूर्वीसारखी वागत नसल्याचे सतईच्या लक्षात आले. त्याने तिला विचारले, त्यावर ती काही बोलली नाही. पण एकदिवस सतईने त्या दोघांना पकडले. दोघांना घेऊन तो थेट पोलिस ठाण्यात हजर झाला.

पोलिस ठाण्यात आल्यावर सतईने बायकोचे तिच्या प्रियकरासोबत लग्न लावण्याची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे शिवानंद, सीमा आणि पोलिसांना पण धक्का बसला. त्यांनी न्यायालयात ही प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले. सतई सीमाला घेऊन घरी गेला. तिच्या घरच्यांना बोलावून घेतले. त्याच्या आई-वडिलांना हा प्रकार सांगितला. सीमाचे शिवानंदसोबत लग्न लावण्याची इच्छा त्याने व्यक्त केली. त्यानंतर त्याने सीमाला तिच्या माहेरी सोडले. पुढे दोघांच्या नोंदणी विवाहाची प्रक्रियासुद्धा त्यानेच करून दिली. शिवानंदने सतईचे आभार मानले. सीमाला आनंदात ठेवणार असल्याचे त्याने सांगितले.

सतईने पत्नी सीमाला शिवानंदसोबत लग्न करणार का, असा पहिला प्रश्न केला होता. तिने तात्काळ होकार दिल्याने सतईने मग न्यायालयीन प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी अर्ज केला. त्यानंतर त्यांच्या नोंदणी विवाहाची तयारी पण करून दिली. दोघांचे लग्न झाले. सतईच्या मते पत्नी प्रियकरसोबत राहू इच्छित होती. त्यामुळे तो या प्रेमाच्या आड येऊ इच्छित नव्हता. गावकऱ्यांनी सतईच्या भूमिकेचे कौतुक केले आहे.



## आधुनिक शाहजहान!

सध्या एक घर खूपच चर्चेत आहे. या घराची रचना अगदी ताजमहालसारखी आहे. दूरवरुन पाहिल्यास इथेही ताजमहाल बांधला गेला आहे, असे वाटते. पण ही ऐतिहासिक इमारत किंवा हॉटेल नाही, तर एका जोडप्याचे खासगी घर आहे. हे अनोखे घर मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर जिल्ह्यात आहे.

हे आलिशान चार बीएचके घर तेथील व्यापारी आनंद प्रकाश चौकसे यांनी खास त्यांच्या पत्नीसाठी प्रेमाचे उदाहरण म्हणून बांधले आहे. मुगल सम्राट शाहजहान यांनी त्यांच्या बेगम मुमताजसाठी ताजमहाल बांधला होता तसेच यांनी हे घर बांधले आहे. या घराच्या बांधकामात डिझाइनकडे विशेष लक्ष दिले गेले आहेच पण प्रत्येक लहान-मोठ्या तपशीलात ताजमहालची झलक स्पष्टपणे दिसते. चमकदार पांढऱ्या रंगाची ही इमारत दुरूनच लोकांचे लक्ष वेधून घेते. तिचे उंच मिनार, घुमट आणि सुंदर कोरीव काम ताजमहालची आठवण करून देते.

आनंद प्रकाश चौकसे म्हणतात, ते सुरुवातीपासूनच ताजमहालच्या सौंदर्याचे वेडे होते आणि त्यांच्या पत्नीसाठी नेहमीच काहीतरी खास करायचे होते. या इच्छेने त्यांना हे भव्य घर बांधण्याची प्रेरणा मिळाली. आता त्यांचे हे घर त्यांच्या कुटुंबासाठी राहण्यासाठी एक सुंदर ठिकाण नाही, तर बुऱ्हाणपूर शहरासाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. चौकसे शहरात एक निवासी शाळा चालवतात. त्यात सुमारे २२०० मुले शिक्षण घेतात. ते म्हणतात, हे त्यांचे कुटुंब आहे.

## रिक्षा चालकाची अजब कमाई!

मुंबईच्या गर्दीत आणि वाहतुकीत दररोज हजारो ऑटोरिक्षावाले प्रवाशांच्या शोधात इकडे तिकडे धावतात. पण या ऑटोवाल्यांपैकी एकाने कमाईच्या बाबतीत इतरांना मागे टाकले. तो तास न तास ऑटो न चालवता, घाम न गाळता महिन्याला लाखो रुपये कमवू लागला. 'सोशल मीडिया'वर त्याच्या कमाईचे रहस्य उघड झाल्यानंतर सर्वांनाच आश्चर्य वाटले. सध्या त्याचे दुकान बंद करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.



ही कहाणी मुंबईतील अमेरिकन दूतावासाच्या बाहेर सुरू झाली. दररोज मोठ्या संख्येने लोक व्हिसा मुलाखतीसाठी येथे येतात. पण दूतावासाचे नियम खूप कडक आहेत. आत जाताना कोणीही बॅग, मोबाईल किंवा पर्स घेऊन जाऊ शकत नाही. या हुशार ऑटोवाल्याने पैसे कमवण्यासाठी या संधीचा उपयोग करून घेतला. गेल्या आठवड्यात 'व्हेन्यू मंक'चे सह-संस्थापक राहुल रुपानी यांनाही व्हिसासाठी येथे यावे लागले. त्यांना त्यांची बॅग दूतावासात नेण्यापासून रोखण्यात आले तेव्हा त्यांना त्यांच्या सामानाचे काय करायचे याची चिंता वाटली. अचानक जवळच उभ्या असलेल्या एका ऑटो चालकाने त्यांना बॅग स्टोरेज इथे असून त्यासाठी फक्त एक हजार रुपये लागतील, असे सांगितले. राहुलला प्रथम तो कदाचित मस्करी करत असेल, असे वाटले. पण नंतर खरा प्लॅन उघडकीस आला. प्रत्येक बॅगसाठी एक हजार रुपये निश्चित करण्यात आले होते. तो रिक्षावाला दररोज अशा शेकडो लोकांच्या बॅगा सांभाळतो आणि प्रत्येक बॅगसाठी एक हजार रुपये घेता, असे राहूलला कळले. म्हणजे तो ऑटो न चालवता महिन्याला ५ ते ८ लाख रुपये कमवत होता.

दूतावासाबाहेर स्टोरेजसाठी कोणतीही अधिकृत व्यवस्था नव्हती म्हणून या रिक्षा चालकाने पोलिसांशी संगनमत करून हा व्यवसाय सुरू केला. लोक फक्त येऊन त्यांच्या बॅगा जमा करायचे आणि मुलाखतीसाठी दूतावासात जायचे. राहुलने त्याच्या लिंक्डइनवर अकाऊंटवर हा संपूर्ण प्रकार उघडकीस आणला तेव्हा 'सोशल मीडिया'वर एकच खळबळ उडाली. बिझनेस टायकून हर्ष गोयंका यांनीही त्यांची पोस्ट लाईक केली आणि या चालकाच्या जुगाडाला सलाम केला. तथापि, एका सामान्य माणसाला अशा प्रकारे मोठी रक्कम कशी द्यावी लागत आहे, यावरही लोक संतापले. पोस्ट व्हायरल होताच पोलिसांनी कारवाई केली. आता हा व्यवसाय बंद करण्यात आला आहे. रिक्षा चालकाची चौकशी केली जात आहे आणि कोणत्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा गेम सुरू होता याचाही तपास केला जात आहे.




## विचित्र नावांची गावे

काही गावांची विचित्र नावे ऐकून लोक सुरुवातीला हसतात. मग प्रश्न पडतो की हे नाव काय आहे? आणि ते कोणी दिले? उत्तर प्रदेशातील एका गावाचे नाव 'सुअर' आहे. कर्नाटकातील एका गावाचे नाव 'कुट्टा'. ही नावे ऐकल्यानंतर, एखाद्या व्यक्तीचा स्वतःच्याच कानावर विश्वास बसणार नाही; परंतु वस्तुस्थिती तशीच आहे.

रायपूरमधील एका गावाचे नाव 'लडकी' आहे, तर गंगापूर परिसरात 'रंगेली' आणि 'मेहंदी' गावेदेखील आहेत. करेरा परिसरात 'रेल' हेदेखील एका गावाचे नाव आहे. बिजोलियामध्ये सुंठी, बांका, भुंटी, फूलन अशी गावे आहेत. येथे सरकी कुंडी, नीमडी गावा, पापडबार अशी काहीही नावे आहेत. झरोली सर्कलमध्ये 'भोपी की राते' नावाचे एक गाव आहे. गावकऱ्यांच्या विनंतीवरून अनेक गावांची नावे बदलली जात असली तरी काही इतर गावांची नावे अजूनही तीच आहेत.

काहींची नावे अन्नपदार्थांवर आधारित आहेत. कोटडी परिसरातील एका गावाचे नाव 'प्याज' आहे. काही गावांची नावे लोकांच्या नावांवर आधारित आहेत. 'दयाराम जी का गुढा', 'रामसिंहजी खेडा' अशी ही नावे आहेत.

मंडल परिसरात 'मिलडी' नावाचे एक गाव होते. गावाचे नाव सांगायला लोकांना लाज वाटायची. त्यानंतर या गावाचे नाव रामनगर ठेवण्यात आले. मंडलगड परिसरात 'उंदरोन का खेडा' नावाचे एक गाव आहे. स्थानिक भाषेत उंदराला उंद्रा म्हणतात. त्याचप्रमाणे मीठा, सांड, 'मोचडियों का खेडा', गोठ, गोथरा हीदेखील ही गावांची नावे आहेत. जहाजपूर परिसरात एकलमाडी, उलेला, 'खाना का खोहला' ही गावे आहेत.. मंडलगड परिसरात, बदनपुरा, कोतवाल का खेडा अशी नावे आहेत. जहाजपूरमध्ये बिहाराला जीरा, गलिया, रोजडी अशी नावे आहेत. आर्सिदमध्ये जाली, रायपूरच्या झाडोलमध्ये डांगरा-दांगडी अशी नावे ऐकू येतील. बिजोलियामध्ये शिकारगाह, तिखी, काकी, आती इत्यादी नावे आहेत. ती कोणालाही विचित्र वाटतील.



## भन्नाट चवींचे पदार्थ

मोदक, पाणीपुरी, मसाला मिल्क, मिरची, आलं-लिंबू हे आईस्क्रीमचे भन्नाट फ्लेवर्स खवय्यांना भुलवतात. पदार्थांमध्ये वेगवेगळी कॉम्बिनेशन्स केली जातात. चॉकलेट सँडविच, चॉकलेट डोसा, पावभाजी डोसा, पालक पनीर डोसा हे पदार्थ आज लोकप्रिय झाले आहेत. मात्र कोणाच्या डोक्यातून कोणती सुपीक कल्पना निघेल याचा नेम नसतो. आपण विचारही करू शकणार नाही, असे पदार्थ सध्या इंटरनेटवर लोकप्रिय ठरले आहेत. या पदार्थांचे फोटो बरेच व्हायरल होत आहेत. काहींना ही कल्पना भावली आहे तर काहींनी नाकं मुरडली आहेत. कुरकुरे मिल्कशेकची रेसिपी बरीच व्हायरल झाली आहे. कुरकुरे हा अनेकांचा आवडता पदार्थ आहे. मात्र कुरकुरे मिल्कशेक ही संकल्पना पचणं तसं कठीणच. गुलाबजाम पिझ्झाचा फोटोही व्हायरल झाला आहे. यात पिझ्झावर गुलाबजाम ठेवल्याचं पहायला मिळतं. मात्र अशा प्रकारच्या पिझ्झाचा विचारही आपण करू शकत नाही. अर्थात कोणाला कोणती चव आवडेल, हे सांगता येणार नाही. मात्र असले भन्नाट पदार्थ भविष्यात लोकप्रिय झाले तर आश्चर्य वाटायला नको.



## आयव्हीएफ तंत्राने जन्मला बेडूक!

आयव्हीएफ तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भधारणा केली जाते. अपत्यहीन जोडप्यांसाठी आयव्हीएफ तंत्रज्ञान हे एक वरदान ठरलं आहे. मात्र याच तंत्रज्ञानाचा वापर करून बेडकांची नष्ट होणारी प्रजाती जतन करण्याचं काम होत आहे. ओलफ प्रजातीच्या एका बेडकाचा जन्म आयव्हीएफ तंत्रज्ञानाद्वारे झाला आहे. ओलफ प्रजाती दुर्मीळ होत चालली आहे. १९८७ पासून या प्रजातीच्या बेडकांची संख्या खूप कमी झाली आहे. या प्रजातीच्या बेडकांचं अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अमेरिकेतल्या टेक्सासमधलं फोर्ट वर्थ प्राणीसंग्रहालय आणि मिसिसिपी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. या प्रक्रियेसाठी सहा नर बेडकांचे शुक्राणू गोठवून ठेवण्यात आले होते. या शुक्राणूंचं दोन मादी बेडकांच्या बीजांडांशी फलन घडवून आणण्यात शास्त्रज्ञांना यश आलं आणि या बेडकाचा जन्म झाला. आयव्हीएफ तंत्रज्ञानाने जन्मलेल्या या बेडकाचं वजन अवघं सहा ग्रॅम आहे. फोर्ट वर्थ प्राणीसंग्रहालय आणि मिसिसिपी विद्यापीठ गेल्या अनेक वर्षांपासून हार्मोन थेरपी आणि प्रजननाच्या कृत्रिम पद्धती विकसित करण्यावर काम करत आहेत. यामुळे भविष्यात विविध प्रजातींचं संरक्षण शक्य होणार आहे.

## लग्नात उभा केला दुसराच वर!




उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये नियोजित वराच्या जागी दुसऱ्यालाच उभे केल्याचा प्रकार समोर आला. पण इथे वधूला शेवटच्या क्षणी सत्य कळले आणि तिने लग्न रद्द केले. त्यामुळे बराच गोंधळ उडाला. पोलिसांनाही बोलावण्यात आले. त्यानंतर वराला रिकाम्या हाताने परतावे लागले.

वधूपक्षाने वराच्या कुटुंबावर फसवणूक केल्याचा आरोप केला. ते म्हणाले, आम्हाला दुसऱ्याचा फोटो दाखवण्यात आला होता आणि वेगळाच वर सेहरा घालून आला. लग्नासाठी आलेला वर वधूच्या वडिलांच्या वयाचा होता. अशा परिस्थितीत वधूने लग्न करण्यास नकार दिला. मात्र वधूच्या बाजूने या प्रकरणात पोलिसांकडे कोणतीही तक्रार दिली नाही. उलट त्यांना जेवण देऊन परत पाठवण्यात आले. इंदूरहून फुलपूर कोतवाली परिसरातील एका गावात लग्नाची मिरवणूक आली होती. वधूच्या बाजूच्या लोकांनी लग्नाच्या मिरवणुकीत आलेल्या लोकांना अल्पोपहार आणि पाहुणचार दिल्यानंतर संध्याकाळी मिरवणूक दाराशी पोहोचताच द्वारचार विधी सुरु झाला.

लग्नासाठी सजलेल्या वधूने वराला पाहताच तिने त्याच्याशी लग्न करण्यास नकार दिला आणि म्हटले, वर तिच्या वडिलांच्या वयाचा आहे. ती इतक्या वयस्कर वराशी लग्न करणार नाही. यामुळे गोंधळ उडाला. वधूच्या बाजूच्या लोकांनी वर बदलल्याचा आरोप करत लग्नाच्या मिरवणुकीत गोंधळ घातला. पंचायत तासन्तास चालली. परंतु कोणताही उपाय सापडला नाही.

माहिती मिळताच, फुलपूर पोलिस घटनास्थळी पोहोचले. काहींच्या समजूतदारपणामुळे प्रकरण कसेबसे मिटले. वराचा स्वभाव पाहून बहुतेक लोक रात्रीच इंदूरला निघून गेले. माणुसकी दाखवत तिथे राहिलेल्या वऱ्हाडी मंडळींसाठी जेवणाची व्यवस्था केली आणि त्यांना सकाळी घरी जाऊ दिले. इंदूरहून आलेला वर वधूशिवाय रिकाम्या हाताने परतला.





## स्मार्टफोनची सवय सोडवण्यासाठी...

आजकाल लहानग्यांच्या हाती फक्त स्मार्टफोन दिसतो. स्मार्टफोनमुळे मुलं बाहेर खेळायलाही जात नाहीत किंवा छंद जोपासत नाहीत. लहानग्यांची ही सवय सुटावी यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. विविध युक्त्या लढवल्या जातात. स्मार्टफोन बाजूला ठेऊन मुलांनी दुसऱ्या कामांमध्ये लक्ष घालावं यासाठी भारतासह इतर देशांमध्येही प्रयत्न होताना दिसतात. इंडोनेशियातल्या पश्चिम जावा परिसरातल्या बांडुंग शहरात मुलांना स्मार्टफोन आणि टिव्हीपासून लांब ठेवण्यासाठी अनोखा उपक्रम राबवण्यात आला आहे. इथल्या मुलांना कोंबडीची पिल्लं, रोपटी तसंच बिया दिल्या जात आहेत. मुलांनी स्मार्टफोन बाजूला ठेऊन कोंबडीच्या पिलांची आणि या रोपट्यांची देखभाल करावी, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला आहे. प्रशासनाने इथल्या बारा शाळांमध्ये कोंबडीची दोन हजार पिल्लं आणि १५०० रोपटी तसंच बियांचं वाटप केलं आहे. इंडोनेशियामध्ये इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. या देशातली मुलंही इंटरनेट, स्मार्टफोनच्या आहारी गेली आहेत. यामुळे या देशातलं प्रशासन चिंतेत आहे. मुलांना आणि त्यांच्या पालकांना ही संकल्पना भावली. स्मार्टफोनवर वेळ घालवण्यापेक्षा कोंबडीच्या पिल्लांची तसंच रोपट्यांची देखभाल करणं कधीही चांगलं, असं त्यांचं म्हणणं आहे. मुलांना स्मार्टफोनपासून लांब ठेवण्यासाठी राबवण्यात येणारा हा उपक्रम अनोखा म्हटला पाहिजे.



मुख्याध्यापक लंके यांची बदली रद्द होण्यासाठी आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी वडाच्या झाडाखाली वर्ग भरवून विद्यार्थ्यांना शिकविताना शिक्षक.

# 'रयत'च्या उत्तर विभाग कार्यालय परिसरातच भरले विद्यार्थ्यांचे वर्ग

## मुख्याध्यापक शिवाजी लंके यांची बदली रद्द होण्यासाठी दुसऱ्या दिवशीही विद्यार्थ्यांसह पालकांचे आंदोलन

नगर – लक्ष्मी भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापकाची बदली रद्द होण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांसह पालकांचे रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभाग कार्यालयात दुसऱ्या दिवशी बुधवारी (दि.२ जुलै) देखील आंदोलन सुरु होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये, यासाठी संस्थेच्या उत्तर विभाग कार्यालयाच्या आवारातच वर्ग भरविण्यात आले. वडाच्या झाडाखाली भरलेले वर्ग पाहून उपस्थितांना कर्मवीर भाऊरावांच्या आठवणींना उजाळा दिला.

कापड बाजार येथील लक्ष्मी भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी लंके यांना नुकतीच शाळा सुरु होऊन काही दिवस उलटले असताना त्यांचा अचानक बदलीचा आदेश प्राप्त झाला. आपल्या लाडक्या मुख्याध्यापकाची बदली रद्द होण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांसह पालकांनी पालक संघ समितीच्या माध्यमातून बुरुडगाव रोड येथील रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभाग कार्यालयात बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु केलेले आहे. विद्यार्थी व पालकांनी शाळेवर देखील बहिष्कार टाकल्याने शाळा विद्यार्थ्यांशिवाय भरत आहे. वर्गात एकही विद्यार्थी हजर नसल्याने सर्व वर्ग रिकामे पडले आहे.

आंदोलनस्थळी एकीकडे विद्यार्थ्यांचे वर्ग भरविण्यात आलेले आहेत. तर एका बाजुला पालकांचा देखील ठिय्या सुरु आहे. मुख्याध्यापक लंके यांची बदली रद्द न झाल्यास, यापुढे आक्रमक पवित्रा घेण्याचा इशारा पालकांनी दिला आहे.

# जिल्हा न्यायाधीशांसाठी नव्याने बांधण्यात येणाऱ्या ५० सदनिकांसाठी शासनाच्या विधी व न्याय विभाग मंत्रालयाची सुधारित प्रशासकीय मंजुरी



नगर – जिल्हा न्यायालयाच्या जिल्हा न्यायाधीशांसाठी नव्याने बांधण्यात येणाऱ्या ५० सदनिकांसाठी शासनाच्या विधी व न्याय विभाग मंत्रालयाने सुधारित प्रशासकीय मंजुरी नुकतीच दिली आहे. अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता लक्ष्मीकांत जाधव यांनी दिली.

अहिल्यानगर जिल्हा न्यायालयातील १६ जिल्हा न्यायाधीश, १४ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर आणि २० दिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर यांच्याकरिता निवासस्थाने अशी एकूण ५० न्यायाधीशांसाठी नवे निवासस्थाने बांधण्याकरिता राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाने ३९ कोटी ९० लाख रुपये इतक्या मूळ खर्चास प्रशासकीय मान्यता दिली होती. परंतु हा निधी कमी पडत असल्याने अतिरिक्त निधी देण्याची मागणी आमदार संग्राम जगताप यांनी मंत्रालयाकडे करून पाठपुरवठा केला. त्यांच्या या पाठपुरास यश आले असून न्यायाधीशांच्या नव्या ५० सदनिकांच्या बांधण्याकरता आता तब्बल ६४ कोटी ७३ लक्ष इतका निधी मंजूर झाला आहे.

या निधीमधून ३३ कोटी ८६ लक्ष रुपयांची मूळ इमारत, एक कोटी ८१ लक्ष रुपयांचे रेन वॉटर हार्वेस्टिंग, ३५ लक्ष ४७ हजार रुपयांचे पाणीपुरवठा व मलनिस्सारण योजना, एक कोटी १४ लक्ष रुपयांचे अंतर्गत विद्युतीकरण, २५ लक्ष रुपयांचे अग्निशामक यंत्रणा, २ कोटी ७५ लक्ष रुपयांचे उद्वाहन व सोलर, एक कोटी ८७ लक्ष संरक्षक भिंत, दोन कोटी ९४ लक्ष अंतर्गत रस्ते, एक कोटी ७८ लक्ष फर्निचर आदी प्रमुख कामांसह विविध कामांना शासकीय मान्यता देण्यात आली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून न्यायाधीशांच्या नव्या निवासस्थानांचा प्रश्न रखडला होता. त्यास आमदार जगताप यांनी चालना देऊन भरीव वाढीव निधीची तरतूद शासनाकडून मंजूर करून आणली आहे. या कामास लवकरच सुरुवात होणार आहे.

# भिंगार मधील सराईत गुन्हेगार एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध



भिंगार मधील सराईत गुन्हेगाराला एमपीडीए' कायद्यान्वये स्थानबद्ध करण्याचे आदेश प्राप्त होताच त्यास ताब्यात घेतल्यानंतर भिंगार कॅम्प पोलिसांचे पथक.

नगर – गंभीत स्वरुपाचे ५ गुन्हे दाखल असलेला भिंगार येथील सराईत गुन्हेगार प्रताप सुनिल भिंगारदिवे (वय २९, रा. पंपिंग स्टेशन, सावतानगर, भिंगार) यास एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध करण्यात आले आहे. त्याची रवानगी नाशिक येथील मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली आहे.

भिंगार परिसरात गंभीर स्वरुपाचे गुन्हे करत भिंगारदिवे याने आपल्या साथीदारांसह, गावातील सामान्य नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले होते. या प्रकारांनी सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका निर्माण झाला होता. या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी भिंगार कॅम्पचे सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी एमपीडीए कायद्यानुसार प्रस्ताव तयार करुन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे सादर केला होता. या प्रस्तावाची सखोल तपासणी करुन तो मंजुरीसाठी जिल्हा दंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या कडे सादर करण्यात आला. त्यांनी प्रताप भिंगारदिवे यास एमपीडीए अंतर्गत नाशिक मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. त्या आदेशान्वये भिंगार कॅम्प पोलिसांनी प्रताप भिंगारदिवे यास ताब्यात घेऊन नाशिक कारागृहात स्थानबद्ध केले.

ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर, पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, अंमलदार दिपक शिंदे, रवि टकले, संदिप घोडके, प्रमोद लहारे, महादेव पवार तसेच दक्षिण मोबाईल सेलचे नितीन शिंदे, राहुल गुंडु, रेखा पुंड व कविता हरिश्चंद्रे यांनी केली आहे.

# मंगल कार्यालयाच्या मागे संशयितास पकडले

नगर – रात्रीच्या वेळी अंधारात दुकानाच्या आडोशाला दबा धरुन बसलेल्या इसमाच्या हालचालीवर संशय आल्याने त्या इसमास तोफखाना पोलिसांनी पकडले. ही कारवाई २ जुलै रोजी पहाटे १ वाजण्याच्या सुमारास नगर मनमाड रोडवरील बंधन लॉन मागील एलसन इंडिया बिल्डिंग जवळ करण्यात आली.

तोफखाना पोलीस ठाण्यातील पोलीस आंमलदार वैभव मोढवे आणी अनिकेत आंधळे हे सावेडी परिसरात रात्रगस्त करीत असताना त्यांना डायल ११२ वर कॉल आला की बंधनलॉन मागे एलसन इंडिया बिल्डिंग जवळ एक इसम संशयितरित्या बसलेला दिसत आहे. असा कॉल आल्याने तोफखाना पोलीस तत्काळ त्या ठिकाणी गेले असता, त्यांना एक इसम अंधारात दबा धरुन बसलेला दिसला. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव रोहित सुभाष धोत्रे (वय २२, रा. हलवाई गल्ली, राम मंदिर जवळ, सोनई, ता. नेवासा) असे असल्याचे सांगितले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. यावरुन तो रात्रीच्या अंधारात काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने दबा धरुन बसला असल्याची पोलिसांची खात्री झाली. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल वैभव मोडवे यांनी दिलेले फिर्यादीवरुन रोहित धोत्रे यांच्याविरुद्ध मुंबई पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार बाळासाहेब गिरी हे करीत आहेत.

# व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या इतर मागास वर्गातील मुलींना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी शासन निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करावी

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या इतर मागास वर्गातील मुलींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क देणेबाबत नवीन लेखाशीर्ष उघडण्यास मान्यता देण्यासंबंधी १३ मे रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश संबंधित विभागास देण्यात यावेत अशी मागणी नाशिक विभागीय आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

याबाबत ज्ञानमाता सेवाभावी संस्थेचे रविंद्र बबन मुळे यांनी नाशिक विभागीय आयुक्त यांना निवेदन मेलद्वारे पाठविले आहे. यामध्ये म्हंटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून १३ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे, अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या इतर मागास वर्गातील मुलींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क १०० टक्के देण्यात येण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर योजनेसाठी अहिल्यानगर जिल्ह्यात दोन नवीन लेखाशीर्षे उघडण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी कार्यक्षमतेने होण्यासाठी सर्व संबंधित कार्यालयांना आवश्यक आदेश तातडीने देण्यात यावेत, जेणेकरून पात्र विद्यार्थिनींना या योजनेचा त्वरित लाभ मिळू शकेल. तरी सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि संबंधित यंत्रणेला सूचना करण्याबाबत त्वरित आवश्यक कार्यवाही करावी. अशी मागणी मुळे यांनी केली आहे.

# केडगाव येथील रभाजीनगर परिसरात विजेच्या लपंडावामुळे नागरिक वैतागले

## कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अधिक क्षमतेची नवीन डीपी उभारा



केडगावच्या रभाजीनगर परिसरात वारंवार वीज खंडित होत असून यावर तोडगा काढावा याबाबत त्रस्त नागरिकांनी आ. संग्राम जगताप यांना निवेदन दिले.

नगर – केडगावमधील प्रभाग क्र. १६ अंतर्गत येणाऱ्या रभाजीनगर, वैष्णवनगर, भूषणनगर आणि आजूबाजूच्या परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे स्थानिक नागरिक हैराण झाले आहेत. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अधिक क्षमतेची नवीन डीपी उभारण्याची मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे.

भीमाशंकर सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मनोज कराळे यांच्यासह स्थानिक नागरिकांनी आमदार संग्राम जगताप यांची भेट घेऊन वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याचा प्रश्न मांडण्यात आला. सद्यस्थितीत ही डीपी अपुरी पडत असल्याने वीज पुरवठा खंडित झाल्यास नागरिकांचे रोजचे दैनंदिन काम, विद्यार्थ्यांचे अभ्यास, घरगुती काम करण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहे. काहीवेळा तर दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होतो. परिणामी, नागरिकांमध्ये संताप वाढत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर विद्युत महावितरणच्या अधिकाऱ्यांशी पाठपुरावा करुन संबंधित विभागाला नवीन व अधिक क्षमतेची डीपी लवकरात लवकर उभारण्याच्या सूचना देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

रभाजीनगर येथील जुन्या डीपीद्वारे वैष्णवनगर, भूषणनगर आदी भागांना वीजपुरवठा करण्यात येतो. परंतु गेल्या काही वर्षांत या भागात लोकसंख्या आणि घरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी, वीज कनेक्शनची संख्या वाढूनही डीपी मात्र जुन्याच क्षमतेची आहे. या वाढलेल्या भारामुळे वारंवार ट्रिपिंग व वीज खंडनाचा सामना नागरिकांना करावा लागत असल्याचे मनोज कराळे यांनी म्हटले आहे.

यावेळी शारदा राठोड, सुवर्णा वाघ, राजश्री साळवे, मंजू निमसे, संतोष राठोड, प्रकाश चोथे, संध्या अंधारे आदी उपस्थित होते.

# रात्रीच्यावेळी फिरणाऱ्या संशयितास स्टेशन रोडवर पकडले, दोघे पसार

नगर – पहाटेच्या सुमारास अंधाराचा फायदा घेऊन काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयास्पद हालचाली करणाऱ्या तीन व्यक्तींपैकी एकास कोतवाली पोलिसांनी शिताफीने पकडले. तर दोघे जण अंधाराचा फायदा घेत पसार झाले आहेत. ही कारवाई स्टेशन रोडवरील पंडित हॉस्पिटल जवळ २ जुलै रोजी पहाटे ३.३० च्या सुमारास करण्यात आली.

कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरिक्षक कृष्णकुमार सेदवाड, पो. हे.कॉ. सचिन गायकवाड व चालक सहायक फौजदार बोडखे हे स्टेशन रोड वर गस्त घालत असताना त्यांना पंडित हॉस्पिटल जवळ ३ इसम मोटारसायकल वरुन संशयितरीत्या फिरताना दिसले. पोलिसांना पाहताच ते अंधाराचा फायदा घेत तोंडावर रुमाल बांधून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी तत्काळ त्यांचा पाठलाग करुन एकास पकडले. त्याची चौकशी केली असता त्याचे नाव सैफ समिर सय्यद (वय २१, रा. जुनाबाजार, भिस्त गल्ली, अ.नगर) असे सांगितले.

त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यावर त्याने आपल्या साथीदाराचे नाव अब्दुल रेहमान शेख (रा. मार्केटयार्ड, अ.नगर) असल्याचे सांगितले. तिसरा साथीदार मात्र अनोळखी असल्याचे सांगितले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाही. पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास महिला पोलीस नाईक पंडीत करीत आहेत.



आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने अहिल्यानगरमध्ये हजारो वर्षांपूर्वीचे मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दोन अवशेष दर्शनासाठी आणले होते. यावेळी स्वामी वैशंपायन यांनी रुद्राभिषेक केला.

# सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या मूळ अवशेषांच्या दर्शनाने भाविक भारावले

## शंकर महादेवाच्या जयजयकारात हजारो भाविकांनी घेतले दर्शन

नगर – गुजरातच्या सौराष्ट्र येथील सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या हजारो वर्षांपूर्वीच्या मूळ अवशेषांच्या दर्शनाने अहिल्यानगरचे भाविक भारावले. आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने अहिल्यानगरमध्ये दोन अवशेष दर्शनासाठी आणण्यात आले होते. पाईपलाईन रोड वरील गावडेमळा येथील ध्यान मंदिरात शहरातील भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. आर्ट ऑफ लिव्हिंगचे स्वामी वैशंपायन यांनी ज्योतिर्लिंगांवर विधिवत रुद्राभिषेक करून पूजा करून आरती केली. शंकर महादेवाच्या जयजयकारात हजारो भाविकांनी या पुरातन व दुर्लभ सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या मूळ अवशेषांच्या दर्शनाचा लाभ घेतला.

स्वामी वैशंपायन यांनी या पुरातन ज्योतिर्लिंगांच्या अवशेषांची माहिती देताना सांगितले की, हजारो वर्षापूर्वी सोमनाथ ज्योतिर्लिंग हे चंद्रापासून निर्मित झाले होते. ज्योतिर्लिंगाच्या मूळ मंदिरावर अनेकदा हल्ले करून लुट करून ज्योतिर्लिंगाला अनेकदा खंडित केले. तेव्हा या खंडित ज्योतिर्लिंगाचे काही अवशेष काही पंडितांनी हजारो वर्ष पूजा करत जतन केले. आता हे मूळ अवशेष श्री श्री रविशंकर महाराजांकडे देण्यात आले आहेत. हजारो वर्षांनंतरही या अवशेषांमध्ये आजही चंद्राप्रमाणे खूप उर्जा आहे, असे सांगून दोन्ही अवशेष एकमेकांच्या जवळ आणून त्यांच्यात असलेल्या चुंबकीय शक्तीमुळे ते आपोआप कसे हलायला लागतात हे दाखवले. या अद्भुत शक्तीने अहिल्यानगरचे भाविक आश्चर्यचकित झाले व शिवशंकराच्या जयघोषात आनंद व्यक्त केला.

यावेळी आर्ट ऑफ लिव्हिंगचे सत्संग विभागाचे भूषण मालू व गिरीराज जाधव यांनी शंकर महादेवाची गाणे सादर केले. अहिल्यानगरच्या आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराचे राजेंद्र पाचे, मेघना मुनोत, सुनीता घाडगे, जयश्री कोल्हे, सुपर्णा देशमुख, अर्चना पतंगे, दिलीप गंधरे व चंद्रकांत तागड यांनी ध्यान मंदिरातील पूजाविधीचे नियोजन केले.

# मोटार वाहन निरीक्षकांचा तालुकानुसार दौरा निश्चित

नगर– प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहिल्यानगर यांच्या मार्फत जुलै ते डिसेंबर २०२५ या कालावधीत मोटार वाहन निरीक्षकांचा तालुकानुसार दौरा निश्चित करण्यात आला असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी दिली आहे.

शेवगाव व श्रीगोंदा तालुक्यांमध्ये – जुलै : ८ व २२. ऑगस्ट : ५ व १९. सप्टेंबर : ९ व २३. ऑक्टोबर : ७ व २८. नोव्हेंबर : ६ व १८. डिसेंबर : ९ व २३.

कर्जत व पाथर्डी तालुक्यांमध्ये – जुलै : ९ व २३. ऑगस्ट : ६ व २०. सप्टेंबर : १० व २४. ऑक्टोबर : ८ व २९. नोव्हेंबर : ७ व १९. डिसेंबर : १० व २४.

पारनेर व जामखेड तालुक्यांमध्ये – जुलै : १० व २४. ऑगस्ट : ७ व २१. सप्टेंबर : ११ व २५. ऑक्टोबर : ९ व ३०. नोव्हेंबर : १० व २०. डिसेंबर : ११ व २६.

प्रत्येक तालुक्याचा मासिक दौरा वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे. संबंधित दिवशी शासकीय अथवा सार्वजनिक सुट्टी असल्यास किंवा प्रशासकीय कारणास्तव दौरा रद्द झाल्यास, त्या दिवसाचा दौरा दुसऱ्या सोईस्कर दिवशी घेतला जाईल व त्याची तारीख स्वतंत्रपणे जाहीर केली जाईल.

शिबिरात अर्जदारांची अपूर्ण कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाहीत. सर्व शुल्क ऑनलाइन पद्धतीने भरावे लागेल. दौऱ्याच्या ठिकाणी परराज्यातून आलेली वाहने तसेच बसेसची तपासणी केली जाणार नाही. ज्या तालुक्यात शिबिराचे आयोजन केलेले आहे, त्या तालुक्यातील नागरिकांचेच कामकाज करण्यात येईल.

तपासणीस येणाऱ्या सर्व तात्पुरती नोंदणी झालेल्या, परिवहनेतर (Non-Transport) संवर्गातील वाहनांसाठी डिक्लेमर आवश्यक असून, डिक्लेमर नसलेल्या वाहनांची तपासणी केली जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.



## प्रभागातील ५ मधील सर्व नागरिकांना छत्र्यांचे वाटप

प्रभाग ५ मधील सर्व नागरिकांना भारतीय जनता पार्टीचे माजी शहर जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे यांच्या वतीने पावसाळ्यानिमित्त छत्र्यांचे वाटप करण्यात येणार आहे. भगव्या व हिरव्या रंगाच्या भाजपाच्या झेंड्या सारख्या आकर्षक छत्र्या गुलमोहर रोडवरील संपर्क कार्यालयात कष्टकरी महिलांना देण्यात आल्या. यावेळी मल्हार गंधे, ॲड.ऋग्वेद गंधे, सिद्धेश नाकाडे, सौ.कुलकर्णी आदि उपस्थित होते.

